प्रेषित मुहम्मद (स) आणि भारतीय धर्मशास्त्र

डॉ. एम. ए. श्रीवास्तव

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई

PRESHIT MUHAMMED & BHARTIYA DHARMAGRANTH

प्रेषित मुहम्मद [स.]

आणि

भारतीय धर्मशास्त्र

लेखक : डॉ. एम. ए. श्रीवास्तव

भाषांतर: डॉ. एम. यु. कहाळे अकोला (महा.)

✻ प्रकाशक ✻

इस्लामिक मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट

४, हामिद बिल्डींग, ९६, हाफिज़ अली बहादुर मार्ग,
आग्रीपाडा, मोमीनपुरा, मुंबई - ४०० ०११.
फोन : २३०१८३८७ / २३०८२८२० / फॅक्स : २३०५२००२

PRESHIT MUMAMMED &
BHARTIA DHARMAGRANTH (Hindi)

PRESHIT MUMAMMED &
BHARTIA DHARMASHASTRA (Marathi)

IMP Series No. :- **105**

Written by :- **Dr. M. A. Srivastav**

Translated by :- **Dr. M. U. Kahade** (Akola - Mah.)

Copies :- **2000**

© All Right Reserved

Edition :- **1st (Sept. 2005)**

Published by :- **Islamic Marathi Publications Trust**
4, Hamid Bldg., 96, Hafiz A. B. Marg,
Mominpura, Agripada, Mumbai - 11.
Tel. : 2301 83 87, 2308 28 20,
Fax : 2305 2002

ISBN-81-87634-104 Hadiya Mulya :- **Rs. 10/-**

// अल्लाह, असीम, दयावंत व कृपावंतच्या नावाने //

भाषांतरकाराचे मनोगत

"मुहम्मद (स.) और भारतीय धर्मग्रंथे" ही डॉ. श्रीवास्तव साहेब यांची हिन्दी पुस्तिका वाचल्यानंतर आश्चर्यचकित झालो. विभीन्न धार्मिक ग्रंथामधील अंतिम ईश पैगंबरांविषयी केलेले भाकीत शोधुन ते कोण आहेत. याचा यशस्वी शोध घेणे आणि जनतेसमोर या ईश सत्याला प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करणे खरोखर डॉ. श्रीवास्तव साहेबांची ही अतिशय मोलाची कामगिरी होय.

आजपर्यंत आम्ही भारतीय महामान्य मुहम्मदांना (स.) केवळ मुसलमानांचे पैगंबर समजतो. डॉ. श्रीवास्तव साहेबांनी आमच्या या अज्ञानाला दुर करण्याचा अतिशय सुरेख प्रयत्न केला तो सुध्दा आमच्या धर्मशस्त्रांच्या आधाराने ! खरोखर कळत न कळत आमच्या हातुन किती भयंकर चुक घडत होती ! महामान्य मुहम्मद (स.) तर आम्हा भारतियांचे अंतिम कल्कि अवतार होय. समाजातील धर्म, जात-पात, उच्च-नीच यामधे विभाजीत मानवाला बघून मन नेहमी अस्वस्थ असायच. परंतु हे सत्य समोर आल्यानंतर की, महामान्य मुहम्मद (स.) हेच अंतिम नराशंस ऋषि, कल्कि व अंतिम मैत्रेय आहेत, मनातील ही खंत दुर झाली. परंतु हे सत्य मराठी भाषिकांपर्यंत पोहचते करण्याची जबाबदारी मी महाराष्ट्रीयन असल्यामुळे माझेवर नाही का बरे येणार ? मी एकट्यानेच या सत्यतेच लाभ घेवून स्वत:चे भौतिक व पारलौकिक जीवन सफल करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे तो स्वार्थच नव्हे काय ? मग काय या स्वार्थी मनोवृत्तीने मी यशस्वी होईल ? कदापिही नाही. म्हणुनच या पुस्तिकेचे मी मराठी भाषांतर करीत आहे. आशा आहे मराठी वाचक या पासुन बोध घेतील व धर्माचे हे कथन जे त्यांचे पासुन लपविण्यात आले होते, त्याचे वरही आचरण करतील जेणे करून धर्माच्या एक शिकवणुकीवर आचरण व दुसऱ्याचा धिक्कार या गुन्ह्यापासुन मुक्त होतील. मी ही विनंती करू इच्छितो की शुध्द हृदयाने याचे वाचन करावे आणि मग ठरवावे की विश्व मानविय समाज एकच कुटूंब आहे. व आपसात भाऊ-भाऊ आहेत की, एक दुसऱ्याचे शत्रू आहेत. आशाच नव्हे तर दृढ विश्वास आहे की, याचे आचरणाने भारतीय समाजातील मानविय विभाजनामुळे निर्माण झालेली दुही संपुष्टात येईल.

अल्लाह आम्हा सर्वांना सन्मार्ग प्रदान करा.

हितचिंतक

डॉ. एम. यु. कहाळे

आकोला

मनोगत

अल्लाह अत्यंत कृपाशील व दयावान आहे तोच सृष्टीचा निर्माता आहे. त्याने आपल्या निर्मीतीत मनुष्यांला सर्वात जास्त श्रेष्ठ बनविले. अल्लाहने मानवावर केलेल्या उपकारांची व बक्षीसांची गणना अशक्य प्राय आहे. त्याच्या असंख्य कृपे पैकी विशेष कृपा म्हणजे त्यानेमानवाच्या मार्गदर्शनाचा प्रबंध केला. यासाठी त्याने आपले पैगंबर, रसूल प्रत्येक जातीत व सांप्रदायात पाठविले. कुरआन सांगतो की, ''कोणताही लोकसमुदाय (क़ौम) असा नाही की ज्याच्याकडे आमचा (अल्लाहचा) सावध (सचेत) करणारा आला नाही.'' (३५:२४)

अवतार चा अर्थ कदापिही असा नाही की, ईश्वर स्वतः जातीने (सह-शरीर) पृथ्वीवर येतो. वास्तविकता ही आहे की तो आपले पैगंबर पाठवितो. त्याने मानवाच्या उध्दारासाठी त्याच्या कल्याणासाठी मार्गदर्शन करण्यास वेळो-वेळी आपले पैगंबर, रसूल पाठविले ही क्रमवार श्रृंखला महामान्य प्रेषित मुहम्मद (स.) यांच्यावर संपुष्टात आली. स्वामी विवेकानंद आणि गुरूनानक या महानुभावांनी सुध्दा पैगंबरी व ईशदुतत्वाच्या संकल्पनेचे समर्थन केले. प्रतिष्ठित वरिष्ठ विद्वानांमधे पंडीत सुंदरलाल, श्री बलरामसिंह परिहार, डॉ. वेद प्रकाश उपाध्याय, डॉ. पी. एच. चौबे, डॉ. रमेश प्रसाद गर्ग, पं. दुर्गा-शंकर सत्यार्थी इत्यादिंनी 'अवतार' या शब्दाचा अर्थ ईश्वराद्वारे मानव कल्याणासाठी दूत पैगंबर पाठविणे असाच सांगितला आहे. प्राणनाथी संप्रदायाचे प्रसिध्द विचारवंत श्रीश्मीरीलाल भगत ने सुध्दा याच तथ्याला मान्य केले.

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमनाची पुर्व सुचना बायबल, तौरेत आणि अन्य धर्मग्रंथा सोबत भारतीय धर्मग्रंथातही आढळते. हिन्दु, बौध्द आणि जैन धर्माच्या धर्मग्रंथात अशा प्रकारची पूर्व सुचना दृष्टीगोचर होते. या पुस्तिकेत या सर्व भविष्यवाण्यांना एकत्रित करून प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रेषित पाठविण्यामागे विशिष्ट तथ्य व कारण असते. लोकामध्ये अधर्माची प्रवृत्ती निर्माण होणे, धर्माच्या वास्तविक स्वरुपापासून दूर जाणे आणि मुळ धर्मात मिश्रण झाल्यामुळे पैगंबर पाठविण्यात आलेत. यांनी धर्माला पुन्हा त्याच्या मौलिक स्वरुपात प्रस्तुत केले. (मिश्रीत धर्मांना रद्दबाह्य केले.) आणि एकाच-एक ईश्वराकडे लोकांना बोलावले. प्रेषित मुहम्मद (स.) यांना त्या वेळी पाठविण्यात आले जेव्हा हजरत ईसा मसीह (अ.) यांना येवुन ५०० वर्षा पेक्षा

जास्त काळ झाला होता. नबींच्या (पैगंबरांच्या) शिकवणीं नष्ट अथवा विकृत झाल्या होत्या. सनातन धर्मावर अधार्मिकता आच्छादित होती. ईशभय आणि ईशपरायणता नष्ट झाली होती. मनुष्याला आपल्या निर्मात्याचा ईश्वराचा विसर पडला होता. त्यांनी अनेक ईश्वर घडविले होते आणि स्वत:ला इतके खाली पोहचविले की वृक्ष, डोंगर, अग्नि, पाणी, हवा, पृथ्वी, चंद्र, सुर्य इत्यादि वस्तुंच्या पूजेत लिप्त झाला.

अशा बिकट, दुराग्राही आणि विपरीत परिस्थितीत प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमन झाले. त्यांनी अल्लाहच्या पैगंबराच्या रूपात महान आणि अनुपम सद्क्रान्ति घडवुन आणली. त्यांनी कोणताही नविन धर्म आणला नव्हता. त्यांनी तर मानव जातीच्या अगदी आरंभापासुन प्रचलित सनातन धर्मात (इस्लाम) आलेल्या विकृतीला दुर करून, त्यातील मानविय कल्पनांचे मिश्रण वेगळे करून शुध्द आणि मौलिक रूपात पुन्हा त्याची मांडणी करून आचरण प्रस्तुत केले. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मनुष्याला त्याचे खरे नैसर्गिक अस्तित्व व स्वरुपाचे आकलन घडविले. त्याने प्रचलित केलेल्या भ्रामक, काल्पनिक विचारांचे उन्मुलन केले. त्यांनी मनुष्याला सांगितले की त्याचा ईश्वर - स्वामी केवळ एकच एक आहे. तो निराकार निरंकार आहे. मनुष्याला केवळ त्याचीच दासता स्वीकारायला पाहीजे. केवळ त्याचीच उपासना करायला पाहीजे. आता जर कोणी या धारणेचा संकल्पनेचा आणि भक्ती कर्माचा अस्वीकार करेल तो स्वत:ला मोक्षाच्या विपरीत चुकीच्या मार्गावर उभा करेल. सहाजिकच त्याचे पांय चुकीच्या मार्गाकडेच जातील. अशा स्थितीत त्याची जीवन यात्रा यशस्वी कशी होईल ? (मग तो भ्रामक कल्पनेद्वारे स्वत:ला सन्मार्गावरच का समजेना.)

जीवनाची सुगम, सार्थक, यशस्वी आणि फायदा देणाऱ्या यात्रेसाठी अल्लाहचे अंतिम पैगंबर आणि दूत प्रेषित मुहम्मद (स.) द्वारे प्रस्तुत शिकवणींना आत्मसात करून आपण दाखविलेल्या मार्गावर चालावे. या द्वारेच परलोकातील जीवन सुध्दा सफल होवु शकते. आता हे सत्य लपलेले नाही की भारतीय धर्मग्रंथात ज्या अंतिम अवतार (पैगंबर) च्या आगमनाची पूर्व-सुचना देण्यात आली आहे ते महामान्य प्रेषित मुहम्मद (स.) होय. याच सत्यतेला जाहीर करण्याचा हा एक प्रयास आहे. याचा उद्देश सत्य समजणे व समजाविणे आहे. अंतत: यामधे प्रस्तुत तथ्यांच्या बाबतीत काही त्रुटी राहीली असेल तर आम्हाला अवगत करण्याचे कष्ट करावे हा आग्रह. अल्लाह आमच्या प्रयत्नांना मान्य करो हीच प्रार्थना ! आमीन !

स्थळ - नवी दिल्ली — डॉ. एम. ए. श्रीवास्तव

दिनांक - १२ सप्टेंबर १९९७

महामान्य प्रेषित मुहम्मद (स.) आणि भारतीय धर्मशास्त्र

सत्य नेहमी अगदी स्पष्ट असते, त्यासाठी कोणत्याही पुराव्याची अगर सनदीची गरज नसते. ही गोष्ट वेगळी आहे की, आम्ही सत्यापर्यंत पोहचू शकलो नाही किंवा लोक त्याला हेतु पुरस्पर आमच्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतात. परंतु आता ही गोष्ट दडलेली नाही की, वेद, उपनिषधे आणि पुराणामधे जगाचे अंतिम प्रेषित (पैगंबर) महामान्य मुहम्मद (स.) यांच्या आगमनाची भविष्यवाणी केली आहे. मानवाचे हितचिंतक आणि सत्यनिष्ठ विद्वानांनी अनेक प्रमाण या संदर्भात प्रस्तुत केले आहेत.

वेदांमधे ज्या 'उष्ट्रारोही' (उंटाची स्वारी करणारा) महापुरुषाच्या आगमनाचे पुर्व-भाकीत नमुद केलेले आहे ते महामान्य प्रेषित मुहम्मद (स.) होय. वेदानुसार 'उष्ट्रारोही' चे नाव 'नराशंस' राहील. नराशंस या शब्दाचा अरबी भाषेत अनुवाद 'मुहम्मद' असा होतो. नराशंसाचे जे वर्णन या ग्रन्थांनी रेखाटले त्यात आणि महामान्य मुहम्मद (स.) यांचे आचरण आणि व्यंवहारात चकीत करणारे साम्य आढळते.

पुराणात आणि उपनिषधांमधे 'कल्कि' अवतारा विषयीचे जे भाकीत आहे ते सुध्दा महामान्य मुहम्मद (स.) यांच्याकडे आमचे लक्ष वेधते. कल्किचे व्यक्तित्व आणि चारित्र्याची वैशिष्टे पूर्णपणे महामान्य मुहम्मद (स.) यांच्या जीवन-चारित्र्यावर लांभित होते. इतकेच नव्हे तर उपनिषधांमधे अगदी स्पष्टपणे मुहम्मद (स.) यांचे नाव आले आहे. त्यात त्यांना अल्लाहचा संदेष्टा म्हटले आहे. पुराण आणि उपनिषदांमधे हे सुध्दा सांगितले की, ईश्वर केवळ एकच आहे व त्याचा कुणी सहभागी नाही. या ग्रंथामधे 'अल्लाह' या शब्दाचा उल्लेख अनेकदा करण्यात आला आहे. बौध्द आणि जैनांच्या धर्म ग्रंथातही महामान्य मुहम्मद (स.) यांच्या आगमनाची भविष्यवाणी केलेली आहे.

सत्याच्या या प्रकाशात मानवाला एका सुत्रात बांधने आणि मानविय एकता व अखंडतेला मजबूत करण्यास सार्थक प्रयत्न होवु शकतो. द्वेष आणि

सांप्रदायिकतेच्या या आत्मघाती काळात हे सत्य दीपस्तंभ ठरू शकते. हे एक असे सत्य आहे जे राम-रहीम मीलन घडवून हिंसा शोषण आणि द्वेष रहित आदर्श नैतिक समाजाचे निर्माण करू शकते. याच पवित्र उद्देशाला समोर ठेवून सर्व सत्यांना आपणासमोर प्रस्तुत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रयत्नात आम्हाला कितपत यश लाभले हे आपणच सांगायचे. आशा आहे की हे सत्य हृदयाच्या आत समाविष्ट होवून आम्हा सर्वांना मानव कल्याणासाठी (ईशाज्ञाने) प्रेरित करेल. प्रस्तुत पुस्तिके मधे डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांचे शोधग्रंथ 'नराशंस आणि अंतिम ऋषि' तसेच 'कल्कि अवतार आणि मुहम्मद साहेब' या व्यतिरिक्त अन्य स्त्रोतातून प्राप्त तथ्यांचाही समावेश आहे.

मुहम्मद (स.) आणि वेद

वेदांमधे नराशंस किंवा मुहम्मद (स.) यांचे आगमनाची भविष्यवाणी काही आश्चर्याची बाब नाही. कारण धार्मिक ग्रंथामधे ईशदूतांच्या (पैगंबर) आगमनाची पूर्व सूचना आढळून येते. परंतु आश्चर्याची बाब ही आहे की, महामान्य मुहम्मद (स.) यांचे आगमनाचे पूर्व-भाकीत जितक्या जास्त धर्म ग्रंथात आहे तितके दुसऱ्या पैगंबरा विषयी नाही. ईसाइ, यहुदी (ज्यू) आणि बौध्दांच्या धर्म ग्रंथात अंतिम ईशदूताच्या (पैगंबर) रूपात प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमनाची भविष्यवाणी केली आहे.

वेदांमधील 'नराशंस' हा शब्द 'नर' आणि 'आशंस' या दोन शब्दांनी मिळुन बनला आहे. 'नर' या शब्दाचा अर्थ होतो 'मनुष्य' तर 'आशंस' या शब्दाचा अर्थ आहे 'प्रशंबित' सायण ने नराशंस चा अर्थ मनुष्याद्वारे प्रशंषित सांगितला आहे.[१] हा शब्द कर्मधारय समास आहे याचे विच्छेदन केल्यास 'नरश्चासौ आशंस' अर्थात प्रशंसित मनुष्य असा होतो. म्हणूनच डॉ. वेद प्रकाश उपाध्याय सांगतात या शब्दापासून ईश्वराचा बोध घेवू नये. 'नराशंस' शब्द स्वत:च ही गोष्ट स्पष्ट करतो की, 'प्रंशसित' ज्याचे विशेषण आहे तो मनुष्य आहे. जर कुणी 'नर' या शब्दाला देव-वाचक मानीत असेल तर त्याच्या समाधानासाठी

---

१) नराशंस : यो नैर : प्रशस्यते । (साचण भाष्य, ऋग्वेद संहिता ५/५/२) मुळ मंत्र ''नराशंस : सुबुदतीमं यज्ञमशभ्य:। कविर्हि मधुहस्त्य।''

इतके स्पष्ट करणे आवश्यक आहे की 'नर' हा शब्द देवताचा पर्यायवाची शब्द नाही किंवा देव योनित तशी कोणतीही विशिष्ट जात नाही.[१] स्वामी दयानंद सरस्वतींनी सुध्दा 'नराशंस' चा हाच अर्थ सांगितला आहे.[२]

नर या शब्दाचा अर्थ मनुष्य होतो कारण 'नर' शब्द मनुष्याच्या पर्यायवाची शब्दांपैकी एक आहे. नराशंसा प्रमाणे 'मुहम्मद' या शब्दाचा अर्थ 'प्रशंषित' होतो. मुहम्मद शब्द 'हम्द' धातु पासुन बनला आहे. ज्याचा अर्थ प्रशंषा करणे असा होतो. ऋग्वेदात 'कीरि' हे नाव आले आहे. 'कीरि' चा अर्थ होतो 'ईश्वर प्रशंषक' 'अहमद' शब्दाचा अर्थही हाच होतो. 'अहमद' मुहम्मद साहेबांचेच एक नाव आहे.[३]

वेदांमधे ऋग्वेद सर्वात प्रथम ग्रंथ आहे. यामधे 'नराशंस' शब्दापासुन प्रारंभ होणारे आठ (८) श्लोक आहेत.

१) ऋग्वेद प्रथम मंडल १३ वे सुक्त तीसरे (३) मंत्र

२) ऋग्वेद प्रथम मंडल १८ वे सुक्त ९ वे मंत्र

३) ऋग्वेद प्रथम मंडल १०६ वे सुक्त ४ थे मंत्र

४) ऋग्वेद द्वितीय मंडल ३ रे सुक्त २ रे मंत्र

५) ऋग्वेद पाचवे मंडल ५ वे सुक्त २ रे मंत्र

६) ऋग्वेद सातवे मंडल २ रे सुक्त २ रे मंत्र

७) ऋग्वेद दहावे मंडल ६४ वे सुक्त ३ रे मंत्र

८) ऋग्वेद दहावे मंडल १४२ वे सुक्त २ रे मंत्र

---

१) नराशंस आणि अंतिम ऋषि

२) ऋग्वेद हिन्दी भाष्य (पान २५) प्रकाशक सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा

३) पं. रविन्द्रनाथ त्रिपाठी 'कान्ति साप्ताहीक ८ आक्टोबर - ४ नोव्हेंबर १९९० च्या अंकात. (ऋग्वेदचा मुळ मंत्र ''यो रध्रस्योचोदिताय: कृशस्य यो ब्रह्मणो नाधमानस्य कीरे: ॥ (ऋग्वेद २/१२/६)

उपरोक्त मंत्रामधे 'नराशंस' विषयी वर्णन उपलब्ध आहे. सामवेद संहितेच्या १३१९ व्या मंत्रात तसेच वाजसनेची संहीतेच्या २८ व्या अध्यायातील २७ व्या मंत्रात 'नराशंस' विषयी वर्णन आढळून येते. तैत्तिरीय आरण्यक आणि शतपथ ब्राम्हण या ग्रंथात तसेच यजुर्वेद, सामवेद आणि अथर्व वेदातही 'नराशंस' चा उल्लेख दिसुन येतो.

नराशंसाच्या चारित्रीक गुण - वैशिष्टयांशी मुहम्मद (स.) यांची समानता

वेदामधे नराशंस ची स्तुती केल्याचा उल्लेख आहे. ऋग्वेदच्या काळात कृत युगात यज्ञ प्रसंगी नराशंसला आव्हान दिले जात असे. यासाठी 'प्रिय' शब्दाचा प्रयोग व्हायचा. नराशंसाच्या चारित्रिक विशेषणाचे तुलनात्मक अध्ययन अशा प्रकारे आहे.

१) वाणीची मुधरता - ऋग्वेद मधे नराशंसला 'मधुजिव्ह' म्हटले आहे.[१] म्हणजे मधु-भाषिका त्यांचे व्यक्तीत्वाची विशेषता राहील. हे सर्व विदीत आहे की, मुहम्मद (स.) यांची वाणी अगदी मधुर होती.

२) अप्रत्यक्ष किंवा परलोकाचे ज्ञान बाळगणारा - नराशंसला अप्रत्यक्ष ज्ञान बाळगणारा सांगण्यात आले आहे. या ज्ञनाने युक्त व्यक्तीला कवी सुध्दा म्हणतात. ऋग्वेद संहितामधे नराशंसला कवि म्हणुन संबोधले आहे.[२] महामान्य मुहम्मद (स.) यांना अल्लाहने काही प्रसंगी अज्ञात गोष्टीचे ज्ञान प्रदान केले होते. इस्लामच्या अंतिम पैगंबरांनी रोमी आणि इरानी यांच्या युध्दात रोमींचा पराजय तसेच नऊ (९) वर्षात पुन्हा रोमीयोचा विजय होईल अशी भविष्यवाणी केली होती. नैनवाच्या युध्दात रोमीचा विजय ६५७ इसवी मधे झाला. प. कुरआनचा 'रूम' हा अध्याय याच संदर्भात आहे. रोमीयोच्या पराजया नंतर पुन्हा त्यांच्या विजयाचा उल्लेख यात आला आहे. याच सोबत मुसलमानांचा सत्याचा इंकार करणाऱ्या शत्रुवर विजयाचीही भविष्यवाणी करण्यात आली.

---

१) नरांशस मिहप्रियम स्मिन्यज्ञ उपह्वये । मधुजिह्वं हविषकृतम ।
(ऋग्वेद संहिता १/१३/३)

२) नराशंस : सुदुषूदतीमं यज्ञमदाम्य: । कविर्हि मधुहस्त्य: ।
(ऋग्वेद संहिता ५/५/२)

मुहम्मद (स.) ईश्वराचे सर्वात जास्त प्रिय आणि ईश्वराला सर्वात जास्त जाणणारे होते. ते नबी होते 'नबी' हा शब्द 'नबा' या धातुपासून बनला आहे ज्याचा अर्थ होतो संदेश देणारा. आपण ईश्वराचे संदेश वाहक होते. आचार्य रजनिशच्या शब्दात "मुहम्मद (स.) ईश्वरापर्यंत (अल्लाह) पोहचण्याची बासरी आहे जिच्यात फुंक दुसऱ्या कुणाची आहे."

३) **आकर्षक सुंदरतेचे स्वामी** - नराशंसच्या या सुंदरतेचा उल्लेख ऋग्वेदात 'स्वर्चि' या शब्दाने केला आहे.[१] 'स्वर्चि' या शब्दाचे विच्छेदन 'शोभना अर्चिर्यस्य स :' म्हणजे दैदिप्यमान सुंदरतेने युक्त असा होतो. तात्पर्य हे की कमाल दर्जाच्या सुंदरतेचा धनी ज्याच्या चेहऱ्यातून प्रकाश किरणे निघत आहेत. ऋग्वेदाने हे सुध्दा सांगितले की तो आपल्या व्यक्तीत्वाने घरा-घराला प्रकाशित करेल.[२] महामान्य मुहम्मद (स.) यांनी घरा-घरात ज्ञान-ज्योति प्रज्वलित केली. अज्ञान रूपी अंधकारात भटकत असलेल्या मानवाला ज्ञानाचा नविन प्रकाश दिला.

ऋग्वेदात सांगितले की, "अहमिध्दि पितुष्परि मेधामृतस्य जग्रभ ।
अहं सूर्य इवाजनि ॥" (८:६-१०)

अहमिधि पितुः सामवेद म्हणतो, परिमेधामृतस्य जग्रभ । अहं-
सूर्य इवाजनि ॥ (२/६/८)

अर्थात - अहमदने (मुहम्मद) आपल्या पालनकर्त्या कडून तत्व दर्शितापूर्ण जीवन व्यवस्था प्राप्त केली. मी सुर्याप्रमाणे प्रकाशमान होत आहे.

मुहम्मद साहेब (स.) इतके सुदंर होते की, लोक स्वतः त्यांचेकडे आकर्षित होत असत. 'मुहम्मद अॅन्ड मुहम्मेदनिज्म' मधे रेवरेंड बासवर्ध लिहतो की, मुहम्मद (स.) साहेबांचे विरोधक सुध्दा त्यांच्या आकर्षक व्यक्तीमत्वाने प्रभावित होवुन त्यांचा सन्मान करण्यास बाध्य होत होते. अनेक अडथळे आणि विरोध असतांनाही मुहम्मद (स.) साहेब घरा-घरात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करीत होते.

---

१) नराशंस : प्रति धामान्य ज्जन तिस्त्रो दिवः प्रति महा स्वर्चिः ॥
(ऋग्वेद संहिता २/३/२)

२) नराशंस : प्रति धामान्य ज्जन तिस्त्रो दिवः प्रति महा स्वर्चिः ॥
(ऋग्वेद संहिता २/३/२)

४) पाप-निवारक - ऋग्वेदात नराशंसला लोकांना पापजन्य कृत्यापासून परावृत्त करणारा म्हटले आहे.[१] हे सांगावयाची गरज नाही की, महामान्य मुहम्मद (स.) यांची शिकवण आणि आपणावर अवतरित पवित्र कुरआन मनुष्याला त्याच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातून पापमुक्त करतो. हा सन्मार्गाचा असा आरसा आहे ज्याला बघुन आचरण केल्याने मनुष्याला सर्व पापांपासुन हमखास मुक्ती मिळते. त्याचे इहलोक आणि पारलौकिक जीवन आनंदमय होते. इस्लाम जुगार मद्य (दारु) आणि अन्य नशा आणणाऱ्या पदार्थांच्या सेवनावर प्रतिबंध घालतो. अवैध पध्दतीने धन संपत्ती प्राप्त करणे, व्याज-खाणे आणि दुसऱ्याचा हक्क (अधिकार) बळकावण्यास पुर्णपणे निषीध्द ठरवितो. तो अत्याचार, दमन आणि शोषण रहित न्यायिक समाजाची स्थापना करतो.

५) धर्मपत्न्यांमधे (बायका) समानता - अथर्ववेदा नुसार नराशंसला १२ पत्न्या राहतील. "उष्ट्रा यस्य प्रवाहिणो वधूमन्तो व्दिर्दश ।

वर्ष्मा रथस्य नि जिहीडते दिव ईषणाम उपस्पृशः ।

(अथर्ववेद कुन्ताप सुक्त २०/१२७/२)

अर्थात - ज्याचे वाहन दोन (२) सुंदर उँटण्या आहेत अथवा जो आपल्या १२ पत्न्यांसह उंटावर स्वार होतो. त्याच्या प्रतिष्ठेची ज्योत वेगाने आकाशाला स्पर्श करून खाली उतरते."

या मंत्रानुसार मुहम्मद (स.) यांना १२ धर्मपत्न्या होत्या

१) हज़रते खदीजा (र.)

२) हज़रते सौदा (र.)

३) हज़रते आयशा (र.)

४) हज़रते हफ्सा (र.)

---

१) नरांशस वाजिनं बाजयन्निह क्षयद्वीरं पुषणं सुम्नैरीमहे ।
रथं न दुर्गाद वसवः सुदानवो विश्वस्मान्नो अहंसो निष्पिपर्तन ॥

(ऋग्वेद १/१०६/४)

५) हज़रते उम्मे सलमा (र.)

६) हज़रते उम्मे हबीबा (र.)

७) हज़रते जैनब बिन्त जहश (र.)

८) हज़रते जैनब बिन्त खुज़ैमा (र.)

९) हज़रते जुवैरिया (र.)

१०) हज़रते सफीया (र.)

११) हज़रते रैहाना (र.)

१२) हज़रते मैमूना (र.)[१]

येथे ही गोष्ट उल्लेखनीय आहे की, महामान्य मुहम्मद (स.) यांच्या शिवाय अन्य कोणत्याही धर्मगुरूला १२ धर्म-पत्न्या नव्हत्या, हिन्दू धार्मिक ग्रंथात काही महापुरूषांना शेकडो पत्न्या होत्या असा उल्लेख आढळतो.

६) आगमन स्थळाची साम्यता - अथर्व वेदाच्या उपरोक्त मंत्रामधे नराशंसच्या वाहनाच्या रुपात उँटाचे वर्णन आले आहे जे नराशंसाची ओळखच नव्हे तर त्यांच्या आगमन स्थळाचेही मार्गदर्शन करते. उँटाची स्वारी म्हणजेच नराशंसाचे आगमन ज्या भागात होईल तेथे उँटाच्या स्वारीचे प्रचलन असेल. हे सर्व विदीतच आहे की उँट वाळवंटी भू-भागात जास्त प्रचलित असतात. महामान्य मुहम्मद (स.) यांचा जन्म अरबच्या रेगिस्तानी (वाळवंटी) भागात झाला.

७) अन्य समानता - अथर्ववेदात अन्योक्ति अलंकाराच्या माध्यमातून नराशंसा-विषयी काही संकेत देण्यात आले आहेत. -

कुन्ताप सुक्ता मधे सांगितले की, ''इदं जना उपश्रृत नराशंस स्तविष्यते ।'' याचा अर्थ बोध करून देत पं. क्षेम करणदास त्रिवेदी लिहतात, ''हे मानवांनो आदर-पूर्वक ऐका की, मानवामध्ये प्रशंषित पुरुष सन्मानित केला जाईल.[२]

---

१) अल्लामा इब्ने जरी यांचे पुस्तकातील हा क्रम आहे.
२) अथर्व वेद हिन्दी भाष्य पृष्ठ १४०१, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, नई दिल्ली ।

एका अन्य मंत्रात म्हटले आहे की,

''एष इषाय मामहे शतं निष्कान् दशस्त्रजः ।

त्रीणि शतान्यर्वतां सहस्त्रा दश गोनाम् ॥'' (अथर्व वेद २०/१२७/३)

अर्थात ईश्वर मामहे ऋषिला १०० सुवर्ण मुद्रा देईल, दह-हजार गायी देईल, तीनशे अरबी घोडे देईल, आणि दहा हार ।

येथे 'मामहे ऋषि' पासून अभिप्रेत महामान्य मुहम्मद (स.) आहेत. आपणास ईश्वराकडून १०० सोन्याच्या मुद्रा प्राप्त होतील. या पासुन अभिप्रेत असे श्रेष्ठ व्यक्ती आहेत ज्यांचे महत्व रत्ना समान आहे. मुहम्मद (स.) यांचे शिकवणीच्या सुरक्षिततेचे कार्य आपले १०० सहकारी करीत असत. इतिहासात हे लोक 'असहाबे सुफ्फा' म्हणुन प्रसिध्द आहेत. हे लोक मुहम्मद (स.) यांच्या शिकवणी व आदेशांची जाणीव लोकांना द्यायचे आणि या ज्ञान-भंडाराला सुरक्षितही करीत असत.

अशाच प्रकारे दहा-हजार गायीशी अभिप्रेत उत्तम दर्जाचे लोक होय. 'गो' हा अलंकारिक शब्द आहे जो चांगल्या व्यक्तीच्या संदर्भात वापरल्या जातो. मुहम्मद (स.) यांचे १० हजार अनुयायी जेंव्हा मक्केत विजयी रूपात पोहचले, तेव्हा त्यांनी युध्द केले नाही किंवा कुणासही त्रास दिला नाही. अगर संपत्ती नष्ट केली नाही म्हणुन त्यांना 'गो' ही उपाधी देण्यात आली.

नराशंसाला ३०० अर्वन ची प्राप्तीचा उल्लेख आला आहे. 'अर्वन' या शब्दाचा शब्दशहाः अर्थ घोडा होतो. हा सुध्दा 'गो' प्रमाणे अलंकारिक शब्द आहे. या पासुन अभिप्रेत असे पराक्रमी योध्दे जे घोड्याप्रमाणे वेगवान व तेजस्वी आहेत. बद्रच्या युध्दा समयी मुहम्मद (स.) यांच्या सहकाऱ्यांची संख्या तीनशे (३००) होती.

नराशंसला 'दहा स्त्रजः' अथवा गळ्यातील हार देण्यात आले म्हणजे दहा असे व्यक्ती होय जे गळ्यातील माळे प्रमाणे नराशंसाला प्रिय आहेत. मुहम्मद (स.) यांचे १० अनुयायी असे होते जे त्यांच्यासाठी प्राणाची आहुति देण्यास नेहमी तत्पर असायचे, अगदी गळ्यातील माळे प्रमाणे आपल्या भोवती राहायचे. या अनुयायांना 'अशर:मुबश्शरा' म्हणतात. मुहम्मद (स) यांनी त्यांच्या हयातीतच त्यांना स्वर्ग-प्राप्तीची सुखद बातमी दिली होती. यांची नावे अशाप्रकारे आहेत.

१) हज़रत अबूबक्र (र.)

२) हज़रत उमर (र.)

३) हज़रत उस्मान बिन अफ्फान (र.)

४) हज़रत तलहा (र.)

५) हज़रत अली (र.)

६) हज़रत सआद् बिन अबि-वक्कास (र.)

७) हज़रत सईद बीन जैद (र.)

८) हज़रत अब्दुल रहमान बिन औफ (र.)

९) हज़रत अबु-उबेदा बीन जर्राह (र.)

१०) हज़रत जुबैर (र.)

अथर्व-वेदाच्या एका श्लोकात म्हटले आहे की, ''हे लोकहो ! लक्ष-पुर्वक ऐका ! नराशंसाची प्रशंसा केली जाईल ६० हजार नव्वद (९०) शत्रु मधे, या हिजरत करणाऱ्या, कर्म (अमल) प्रसारित करणाऱ्याला आम्ही आमच्या संरक्षणात घेतो.'' ऋग्वेदच्या एका मंत्रातही 'मामहे' ऋषिच्या १० हजार शिष्याचे वर्णन आले आहे.

''अनस्वन्ता सतपतिर्मामिहे मे गाबा चेतिष्ठो असुरो मधोनः।

त्रैवृष्णो अग्ने दशभिः सहस्त्रैवैश्वानरः त्र्यरुणाश्चिकेत ॥

(ऋग्वेद मं. ५ सु. २७ मंत्र १)

अर्थात - ''सत्यनिष्ठ, अति विवेकशील, शक्तीशाली, दानशूर मामहे ऋषिने वाणी सह मला सुशोभित केले. सर्व शक्तीमान, सर्व वैशिष्ठयांचा धनी संपूर्ण जगासाठी कृपामय दहा हजार सहकाऱ्यांसोबत (सहावा) प्रसिध्द झाला.''

मामहे ऋषि प्रेषित मुहम्मद (स.) हेच आहेत. डॉ. वेद प्रकाश उपाध्याय 'मामहे ऋषि' महामान्य मुहम्मद (स.) यांनाच समजतात.

पुराणांचे प्रमाण

भविष्य पुराण आणि प्रेषित मुहम्मद (स.)

फक्त वेदच नव्हे तर पुराणात सुध्दा महामान्य मुहम्मद (स.) यांचे कार्य-स्थळ वाळवंटी भू-भाग होण्याचा उल्लेख आहे. भविष्य - पुराणात अगदी स्पष्ट शब्दात सांगितले की, एका दुसऱ्या देशात एक आचार्य आपल्या मित्रा-सोबत येईल. त्यांचे नाव महामद असेल. ते वाळवंटी प्रदेशात येतील. श्लोक बघा किती स्पष्ट आहे.

''एतस्मिन्नन्तिरे म्लेछ आचार्य्येण समन्वितः ।

महामद इति ख्यातः शिष्यशाखा समन्वितः ॥

याच अध्यायाचा श्लोक ६,७ आणि ८ सुध्दा मुहम्मद (स.) साहेबा विषयी आहे. इस्लामचे अंतिम पैगंबराचे (स.) जन्मस्थाना सहित अन्य समानता कल्कि अवतारात सुध्दा मिळतात. त्याचे वर्णन कल्कि पुराणात आहे त्याची चर्चा पुढे येईल.

येथे ही गोष्ट स्पष्ट करून देणे योग्य होईल की, भविष्य पुराणामध्ये अनेक नबींचे जीवन दर्शन घडून येते. इस्लाम वर सुध्दा विस्तृत अध्याय आहे. या पुराणात महामान्य मुहम्मद (स.) यांचे अगदी सटीक वर्णन आढळून येते. यामधील आचार्यांचे नाव 'महामद' हे 'मुहम्मद' या शब्दाच्या जितके जवळ आहे तितकेच अन्य वर्णन ही इस्लामच्या पैगंबरांवर (स.) अगदी खरे उतरत. यातील उल्लेखाची व्याख्या करण्याचीही गरज नाही.

भविष्य पुराणा नुसार शालीवाहन (सात वाहन) वंशी राजा भोज समुद्र-पार (अरब) पोहचेल. या प्रसंगी (उच्च कोटीचे) आचार्य शिष्यांनी घेरलेल्या 'महामद' नामी सुप्रसिध्द आचार्यांना बघेल. (प्रतिसर्ग पर्व ३ अध्याय ३, खंड ३, कलियुगीतिहास समुच्चय)

भविष्य पुराण अगदी स्पष्ट वर्णन करीन सांगतो

''लिङ्गाच्छेदी शिखाहीनः श्मश्रुधारी स दुषकः ।

उच्यालापी सर्वभक्षी भविष्यति जनो मम'' ॥२५॥

''विना कौलंच पशवस्तेषां भक्षा मता मम ।

मुसलेनैव संस्कारः कुशैरिव भविष्यति'' ॥ २६॥

''तस्मान्मुसलवन्तो हि जातयो धर्म-दुषकाः ।

इति पैशाचधर्मश्च भविष्यति मया कृतः ॥२७॥

(भविष्य पुराण पर्व ३, खंड ३, अध्याय १ श्लोक २५, २६, २७)

या श्लोकांचा भावार्थ एणेप्रमाणे आहे

''आमच्या लोकांचा खतना होईल, त्यांचे डोक्यावर शेंडी राहणार नाही, ते दाढी ठेवतील, उँच सुरात पुकारतील (म्हणजे अजाण देतील), शाकाहारी व मांसाहारी दोन्ही गुणांनी युक्त राहतील, परंतु मंत्रान्वये पवित्र केल्या शिवाय पशु भक्ष्य त्यांचेसाठी निषीध्द असेल. (म्हणजे ते हलाल मांस खातील) अशा प्रकारे आमच्या मतानुसार आमच्या अनुयायांचा मुस्लिम संस्कार होईल. यांचे पासुनच मुसलवन्त म्हणजेच निष्ठावानांचा धर्म विस्तार पावेल आणि असे माझे म्हणण्यानुसार पिशाच्च धर्माचा अंत होईल.''

भविष्य पुराणाच्या उपरोक्त भविष्यवाणीची प्रत्येक गोष्ट इतकी स्पष्ट आहे आणि महामान्य मुहम्मद (स.) यांच्यावर अगदी तंतोतंत खरी उतरते. तात्पर्य हेच की या द्वारे महामान्य मुहम्मद (स.) हेच अंतिम पैगंबर (ऋषि) आहेत यामधे कोणाताही संशय राहत नाही. या गोष्टीचे स्पष्टीकरण करणे या प्रसंगी अगदी योग्य वाटते की, पुराणांची रचना इस्लामच्या आगमनापूर्वीची आहे. वेद आणि यासारखे काही पुराण हे इस्लामच्या बऱ्याच काळा पूर्वीचे आहेत.

संग्राम पुराणाची पुर्व सुचना

संग्राम पुराण सुध्दा पुराणांत गणल्या जाते. या पुराणातही ईश्वराचे अंतिम पैगंबर (ऋषि) आणि ईशदूत प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमनाची पूर्व सुचना मिळते. पंडीत धर्मवीर उपाध्याय आपल्या सुप्रसिध्द 'अंतिम ईश्वरदूत'[१] नामी पुस्तकात लिहतात की, कागभुसुन्डी आणि गरूड दोन्ही रामाच्या सेवेत दिर्घ काळापर्यंत राहीले. ते केवळ त्यांचा उपदेश ऐकतच नव्हते. तर तो लोकांनाही सागायचे. या उपदेशांची चर्चा महान संत तुलसीदासजींनी संग्राम-पुराणाच्या अनुवादात केली आहे. ते लिहतात शंकराने त्यांचे पुत्र षण्मुख ला भविष्यात येणारा धर्म व अवतार (ईशदूत) या विषयी पुर्व सुचना दिली होती. अनुवाद अशा प्रकारे आहे.

यहां न पक्षपात कछु राखहुं । वेद, पुराण, संत मत भाखहुं ।।
संवत विक्रम दोऊ अनङ्गा । महाकोक नस चतुर्पतङ्गा ।।
राजनीति भव प्रीति दिखावै । आपन मत सबका समझावै ।।
सुरन चतुसुंदर सतचारी । तिनको वंश भयो अति भारी ।।
तब तक सुंदर मद्दिकोया । बिना महामद पार न होया ।।
तबसे मानहु जन्तु भिखारी । समरथ नाम एहि व्रतधारी ।।
हर सुन्दर निर्माण न होई । तुलसी वचन सत्य सच होई ।।
(संग्राम पुराम, स्कन्द १२ कांड ६ : पद्यानुवाद, गोस्वामी तुलसीदास)

पंडीत धर्मवीर उपाध्याय यांनी याचा भावानुवाद अशा प्रकारे केला आहे. ''(तुलसीदासजी म्हणतात) मी येथे कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता केवळ संत, वेद आणि पुराणांच्या मतांना (विचार) मांडले आहे. सातवी विक्रमी शताब्दी मधे चारही सुर्यांच्या प्रकाशासह तो जन्माला येईल. परिस्थिति कशीही असली तरी प्रेमाने अगर कष्टाने तो आपले मत सर्वांना समजवु शकेल. त्याचे सोबत चार देवता (म्हणजे प्रमुख सहयोगी) राहतील. यांच्या सहाय्याने त्याच्या अनुयायांची संख्या खुपच जास्त वाढेल. जो पर्यंत सुन्दर वाणी (म्हणजे

१) हे पुस्तक १९२७ ईसवी ला नॅशनल प्रिटींग प्रेस, दरियांगज दिल्ली येथुन सर्व प्रथम प्रकाशित झाली.

कुरआन) पृथ्वीवर राहील, (तो पर्यंत) त्याच्या आणि महामद (म्हणजे प्रेषित मुहम्मद (स.)) यांचे शिवाय मुक्ती मिळणार नाही. मनुष्य, भिक्षुक, कीडे-मकोडे आणि पशु या व्रतधारी चे नाम-स्मरण करताच ईश भक्त होतील. पुन्हा कुणी त्याच्या सारखा जन्म घेणार नाही. (अर्थात यानंतर दुसरा रसुल (पैगंबर) येणार नाही.) तुलसीदासजी म्हणतात की, त्यांचे वचन (कथन) सत्य सिध्द होईल.''[१]

कल्कि अवतार आणि प्रेषित मुहम्मद (स.)

संस्कृतचे विद्वान डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांनी आपल्या एका शोध ग्रंथात महामान्य मुहम्मद (स.) यांना कल्कि अवतार म्हटले आहे. कल्कि आणि मुहम्मद (स.) यांच्या गुण-वैशिष्टयांचे तुलनात्मक अध्ययन करून पंडीत उपाध्यायांनी हे सिध्द केले की, कल्कि अवतार झाला आहे आणि ते प्रेषित मुहम्मद (स.) होय. या शोध पुस्तिकेच्या प्रस्तावनेतच ते लिहतात की,

''वैज्ञानिक अणु स्फोटामुळे संभावित विनाशाचे निराकरण धार्मिक एकते संबंधी विचारा द्वारे होवु शकते. पाण्यात राहून मगरीबरोबर शत्रुत्व बाळगणे काही योग्य नाही. म्हणुनच मी हे शोध कार्य केले जो धार्मिक एकतेचा आधार-स्तंभ आहे. राष्ट्रीय एकतेच्या समर्थकांना या शोध-पत्रा वर कोणताही आक्षेप अथवा विरोध होणार नाही. आक्षेप जर कुणाला असेल तर ते फक्त विहरीतील बेडकाच्या प्रवृत्तीचेच असतील. जर ते विहरीच्या बाहेर येवुन जगाला बघतील तर विहरीलाच जग समजण्याची त्यांची भावना हीन ठरेल.'' ''मला पुर्ण विश्वास आहे की, या शोध पुस्तकाच्या अवलोकनाने भारतीय समाजच नव्हे तर अखिल विश्वात एकतेचे किरण संचार करेल आणि धर्माच्या नावावर होणारा कलह शांत होईल.''

या प्रसंगी या शोध पत्रातील विशिष्ट गोष्टी तसेच अन्य स्त्रोताद्वारे या विषयीची माहिती प्रस्तुत करण्यात येत आहे.

---

१) कोष्टकातील शब्द व्याख्येसाठी दिले आहेत. येथे एका गोष्टीचे स्पष्टीकरण करणे अगदी योग्य होईल की, संग्राम पुराणाची गणना अर्वाचीन पुराणात केली जाते परंतु त्याचा आधार प्राचीन हिन्दु धर्म ग्रंथच आहेत. जसे की अन्य पुराण आणि ग्रंथाच्या विचारांच्या आधारावर अर्थात भुतकाळातील प्रमाणांच्या प्रकाशात प्रेषित मुहम्मद (स.) यांचे आगमनाची सुचना देण्यात आली आहे. तात्पर्य हेच की पुराण अर्वाचीन असो अथवा प्राचीन हे सत्य समजण्यास बाधक ठरू शकत नाही.

अवतार (म्हणजे काय ?)

अवतार शब्द 'अव' उपसर्गपूर्वक 'तृ' धातु मधे 'घञ' हा प्रत्यय लावुन बनला आहे. याचा अर्थ पृथ्वीवर येणे असा होतो. 'ईश्वर चा अवतार' याचा अर्थ सर्वांना संदेश देणाऱ्या महात्म्याचा पृथ्वीवर जन्म होणे होय. कल्कि अवताराला ईश्वराचा अंतिम अवतार म्हटले आहे। ''ईश्वर चा अवतार'' या शब्दातील 'चा' संबंधकारक चिन्ह आहे, अत: स्पष्ट आहे की ईश्वराशी संबंधीत व्यक्ती अवतीर्ण होईल. ईश्वराशी संबंधीत म्हणजे कोण ? अर्थातच त्याच्या भक्ताशिवाय कोण असणार ? ऋग्वेदात अशा व्यक्तीला 'कीरि' म्हटले आहे. मराठीत 'कीरि' शब्दाचा अर्थ 'ईश्वराचा प्रशंसक' आणि अरबी भाषेत 'अहमद' असा होतो. परंतु काय ईश्वराचा प्रशंसक, कीरि आणि अहमद एकच होवु शकत नाही. ?

एका अवताराने पुर्ण विश्वाचे कल्याण अप्रगतिशील युगात अशक्यप्राय असल्यामुळे प्रत्येक देशात वेळो वेळी भिन्न-भिन्न अवतार (पैगंबर) झालेत. पवित्र कुरआन सांगतो की जगाच्या प्रत्येक भागात रसुल (संदेष्टे) पाठविण्यात आले होते. अंतिम कल्कि अवतारची ही विशेषता आहे की ते संपूर्ण विश्वासाठी पाठविण्यात आलेत.

जेव्हा लोक वास्तविक धर्मापासुन विमुख होवुन अधर्माच्या मार्गावर कार्यरत होतात किंवा आपल्या स्वार्थासाठी धर्माला आपल्या मर्जीनुसार तयार करतात तेव्हा सरळ मार्ग दाखविण्यासाठी ईश्वर आपले अवतार पैगंबर मानवापैकीच पाठवितो.

अंतिम अवतार (पैगंबर) येण्याचे लक्षण

कल्किच्या अवतरणाच्या काळाचा उल्लेख करीत सांगण्यात आले की, हिंसा आणि अराजकता आपल्या चरमार्थावर असेल अशा बर्बरता पुर्ण साम्राज्यात त्यांचे आगमन होईल. हा तो काळ असेल की वृक्षांची बढती खुंटेल आणि फळे व फुले फारच कमी उगवतील. लुटमार आणि मुलींना जीवंत जमीनीत पुरण्याची प्रथा प्रचलित असेल. एका ईश्वराच्या भक्तीला सोडून असंख्य सजीव आणि निर्जीवांची भक्ती व काल्पनिक देवी देवतांना ईश तुल्य समजण्याची मानसिकता तसेच सतकृत्याच्या नावावर दुष्कृत्यांचे चलन सर्रास होईल. अशा असमान, बिकट परीस्थितीत महामान्य मुहम्मद (स.) पाठविण्यात आले.

सातव्या शतकाच्या प्रारंभ काळात रोमन आणि पर्सियन साम्राज्याची स्थिती जितकी खालावली होती, या पुर्वी इतकी कधीही खालावली नव्हती. बाइजेन्टाइन साम्राज्याच्या क्षीणतेमुळे संपुर्ण शासन भ्रष्ट झाले होते. पादरी लोकांच्या दृष्कृत्यामुळे इसाई धर्म खालच्या शिघेला पोहोचला होता. आपसातील संघर्ष आणि शत्रुत्वामुळे अफरा-तफरी माजली होती. अशा समयी हज़रत मुहम्मद (स.) यांना पाठविण्यात आले. रोमन साम्राज्याच्या संघर्षापासून इस्लाम अगदी दूर होता. या धर्माच्या भाग्यातच हे होते की तो तीव्र गतीने संपुर्ण विश्वात पसरेल आणि पुष्कळशा साम्राज्यांना, शासकांना आणि कुप्रथांचा अगदी त्याप्रमाणे नायनाट करेल ज्याप्रमाणे वेगवान वारा माती उडवुन नेतो.[१] 'सेल' अनुवादीत कुरआनच्या प्रस्तावनेत लिहतात की, "गिरजाघरच्या पादरी लोकांनी धर्माचे तुकडे तुकडे केले आणि शांती प्रेम तसेच सत्कृत्ये लोप पावली होती. ते मुळधर्माशी विसंगत राहीले नाही. धर्माविषयी अनेक मतमतांतर जन्माला आले आणि परस्पर कलहाने थैमान घातले. रोमन गिरजाघरात असंख्य भ्रामक कल्पनांना धर्माचे स्वरुप प्राप्त झाले. मुर्ति-पुजेला हीनतेचे कार्य न समजता ती मोठ्या थाटात होवु लागली.[२] याचाच परिणाम की, एका ईश्वराच्या जागी तीन (३) ईश्वर झाले आणि मरियमला ईश्वराची आई म्हणुन मान्यता प्राप्त झाली. अज्ञानतेच्या अशा काळोखात अल्लाहने आपला अंतिम रसूल पाठविला.

दुसरी महत्वाची गोष्ट ही आहे की, अंतिम अवतार ज्या काळात होईल त्यात युध्द प्रसंगी तलवारीचा वापर आणि घोड्यांची स्वारीची प्रथा असेल. भागवत पुराण सांगतो की, "देवांनी दिलेल्या वेगवान घोड्यावर चढुन आठही एश्वर्या ने व गुणाने मुक्त जगत पति तलवार द्वारे दुष्टाचा संहार करेल."[३] तलवार आणि घोड्यांचा काळ आता संपलेला आहे. आज पासुन १४०० वर्षापुर्वी घोडे आणि तलवारीचा वापर होत असे. या नंतर जवळपास १०० वर्षानंतर कोळसा आणि सोड्याच्या मिश्रणाने स्फोटके तयार व्हायला लागली. वर्तमान युग तर टैंक मिझाइल, अणु बॉम्ब चे आहे.

---

१) Apology for mohommed : by - Gofrey Higgins, Page 2

२) Translation of the Quran, by - Goraye sale, First Translation/ Preface on Page 25/26

३) अश्वमाशुगमारूह्य देवदत्तं जगत्पतिः। असिनासाधुदमनमष्टैश्वर्य गुणान्वितः।।

(भागवत पुराण स्कंध १२, अध्याय २, श्लोक १९)

कल्कि अवताराचे स्थान (आगमन स्थळ)

कल्कि आणि भागवत पुराणानुसार कल्कि अवतार 'शम्भल' नामी गावात होईल. परंतु येथे हे ठरवावे लागेल की 'शम्भल' हे गावाचे नाव आहे की गावाचे 'विशेषण' आहे. डॉ. वेद प्रकाश उपाध्यायांच्या मते 'शम्भल' गावाचे नाव होवू शकत नाही. ते म्हणतात की जर हे गावाचे नाव असते तर त्याच्या स्थितीचेही वर्णन आले असते. भारतात शोधल्याने जर असे गाव मिळालेच तर जवळपास १४०० वर्षापूर्वी लोकांचा उध्दारक महापुरुष जन्मला असल्याचे कोणतेही संकेत नाही. अंतिम अवतार काही केवळ मनोरंजनासाठी नव्हे की त्यांचे आगमन व्हावे आणि समाजात कोणताही बदल होवु नये. तात्पर्य हेच की, 'शम्भल' शब्दाला विशेषण मानून त्याच्या उत्पत्ती वर विचार करायला हवा.

१) 'शम्भल' शब्द 'शम' (शांत करणे) धातु पासुन बनला आहे. अर्थात ते स्थान जेथे शांती प्राप्त होते.

२) सम उप सर्गपुर्वक 'वृ' धातु मधे अप प्रत्यय च्या संयोगाने निष्पन्न शब्द 'संवर' होय वबयोर भेद आणि रलयोर भेद या व्याकरणाच्या सिध्दांताने 'शम्भल' शब्द निष्पन्न झाला. याचा अर्थ होतो 'जो लोकांना आपल्याकडे आकर्षित करतो. किंवा ज्याच्या द्वारे कुणाला निवडले जाते.'

३) 'शम्बर' शब्दाचा निघष्टू शब्दकोषात (१/१२/८८) उदक नावाचा पाठ आहे. 'र' आणि 'ल' मधे अभेद असल्यामुळे 'शम्भल' चा अर्थ होतो पाण्याचा निकटवर्ती स्थळ.[१]

अशा प्रकारे ते स्थान ज्याच्या जवळपास पाणी आहे आणि ते स्थान अत्यंत आकर्षक व शांतीदायक आहे. तेच शम्भल होय अवताराची भूमि पवित्र असते. तात्पर्य 'शम्भल' चा शाब्दीक अर्थ - 'शांती चे स्थळ' होय. 'मक्का' गावाला अरबी मधे 'दारूल अमन' म्हणजे 'शांतीचे घर' म्हटले जाते. मक्का मुहम्मद (स.) साहेबांचे कार्यस्थळ होते.

---

१) कल्कि अवतार आणि मुहम्मद साहेब (हिन्दी) पेज ३०

जन्मतिथि

कल्कि पुराणामधे अंतिम अवतारच्या जन्माचा उल्लेख करीत सांगितले की,

"द्वादस्यां शुक्ल पक्षस्य माधवे मासि माधवम् ।

जातो ददृशतुः पुत्र पितरौ हृष्टमानसौ ॥ (अध्याय २ श्लोक १५)

अर्थात - "ज्याच्या जन्माने दुःखी मानवाचे कल्याण होईल त्याचा जन्म वसंत ऋतु (मधुमास) च्या शुक्ल पक्षात आणि रबी पिकाच्या चंद्रमाच्या १२ व्या तिथीला होईल."

एका अन्य श्लोकात आहे की, कल्कि शम्भल मधे 'विष्णुयश' नामक पुरोहिताच्या येथे जन्माला येईल.[१]

महामान्य मुहम्मद (स.) यांचा जन्म १२ रबीउल अव्वल ला झाला. रबीउल अव्वल चा अर्थ आहे. वसंत ऋतुचा आनंदाचा महीना आपण मक्केत जन्माला आलात. मुहम्मद (स.) यांच्या पिताश्रीचे नाव 'अब्दुल्लाह' होते. जो पुराणाच्या भाकीत 'विष्णुयश' चा अरबी अनुवाद आहे. विष्णु म्हणजे अल्लाह आणि यश म्हणजे बंदा (दास) अर्थात अल्लाहचा बंदा म्हणजेच अब्दुल्लाह

याच प्रमाणे कल्किच्या मातेचे नाव सुमति (सोमवती) म्हणुन पुराणात आले आहे. याचा अर्थ होतो शांत व मननशील स्वभावाची मुहम्मद (स.) यांच्या मातोश्री चे नाव 'आमिना' म्हणजे शांत-स्वभाव असलेली होय.

अंतिम अवताराची वैशिष्ठये

'कल्कि' ची वैशिष्ठे मुहम्मद (स.) साहेबांच्या जीवनचरित्राशी अगदी मिळती जुळती आहेत. याचे तुलनात्मक अध्ययन येथे प्रस्तुत करीत आहोत.

१) घोड्याची स्वारी आणि तलवार धारण करणारे - यापूर्वी आम्ही भागवत पुराणाच्या हवाल्याने ही गोष्ट स्पष्ट केली आहे की, अंतिम अवतार घोड्याची स्वारी करणारा आणि तलवारीने शत्रुचा संहार करणारा असेल. त्याचे

---

१) शम्भलग्राममुख्यस्य ब्राम्हणस्य महात्मनः ।
भवने विष्णुयशसः कल्कि प्रादुर्भविष्यति ॥
(भागवत पुराण, द्वादश स्कंध, २ रा अध्याय, १८ वा श्लोक)

वाहन अतिशय तीव्र गतीने चालणारा असा घोडा सुध्दा असेल जो देवाद्वारे प्राप्त होईल. तलवारी द्वारे दुष्टांचा ते संहार करतील. महामान्य मुहम्मद (स.) यांना फरिशत्या (देवदूत) द्वारे घोडा प्राप्त झाला होता ज्याचे नाव बुर्राक होते. या बुर्राक वर बसुनच अंतिम प्रेषित (स.) यांनी एका रात्रीतून यरूशलम (बैतुलमुकदीस) आणि तेथून वर आकाशाचा प्रवास केला व अल्लाहशी बोलचाल केली. इस्लामी इतिहासात 'मेराज' च्या नावाने ही घटना प्रसिध्द आहे.

महामान्य मुहम्मद (स.) यांना घोडे अतिशय प्रिय होते. त्यांचे जवळ ७ घोडे होते. हजरत अनस (रजि.) म्हणतात मी मुहम्मद (स.) यांना गळ्यात तलवार लटकवुन घोड्यावर स्वार झालेले बघितले.[१] आपल्या जवळ ९ तलवारी होत्या. यात वंश - परंपरागत प्राप्त तलवारी ज्यांचे नावे जुल्फिकार, कलईया अशी होती.

२) दुष्टांचा संहार - कल्किच्या वैशिष्ठ्या मधे ही विशेषता होती की ते दुष्टांचाच दमन करतील.[२] धर्माचा प्रसार आणि दुष्टांच्या संहारासाठी आकाशातून देव मदतीस येतील.[३] महामान्य मुहम्मद (स.) यांनी केवळ दुष्टांचेच दमन केले. त्यांनी डाकू, लुट-मार करणारे किंवा अन्य असामाजिक तत्वांवर जीवन जगणाऱ्यांना मानवतेचा धडा शिकविला आणि सत्याचा मार्ग त्यांचेसाठी प्रशस्थ केला. आपण अशा लोकांना सुसंस्काराने राहणे शिकविले. स्त्रीयांना त्यांचा हक्क बहाल केला. एका ईश्वराच्या कल्पनेला असंख्य देवतांच्या सांगडाने दुषित केले होते त्याचे आपण जोरदार खंडण केले. त्यांनी स्पष्ट सांगितले की, इस्लाम काही नवीन धर्म नव्हे तर तो सनातन धर्मच आहे. दुष्टांच्या संहारासाठी त्यांना फरीश्त्यांची (देवदुतांची) मदत मिळाली. पवित्र कुरआन मधे अल्लाह सांगतो की बद्रच्या युध्दात तुमची अल्लाहने मदत केली तेव्हा तुम्ही फक्त अल्लाहचेच भय बाळगावे, आणि त्याचीच स्तुती करावी. तुम्ही जेंव्हा श्रध्दावंतांना सांगत होते की काय तुमच्या साठी एवढे पुरे नाही की तुमचा रब (पालनकर्ता प्रभू) तुमच्या मदतीस तीन हजार फरिश्ते पाठविल ? जर तुम्ही त्याच्यावर दृढ विश्वास बाळगून धैर्य धराल तर तो अल्लाह तुमची मदत पाच हजार फरिश्त्याद्वारे करेल.[४]

---

१) बुखारी शरीफची हदीस

२) भागवत पुराण १२-२-१९

३) यात यूयं भुवं देवा: स्वांशावतरणे रता: । (कल्कि पुराण, अध्याय २, श्लोक ७)

४) पवित्र कुरआन सुरह (अध्याय) आले इमरान आयत नं.१२३, १२४, १२५

अहज़ाब या अध्यायातही महामान्य मुहम्मद (स.) यांना ईश्वरीय मदत मिळण्याचा उल्लेख आहे. या सूरह (अध्याय) च्या ९ व्या आयातीत म्हटले आहे,

हे श्रध्दावंतांनो ! अल्लाहच्या त्या कृपेचे स्मरण करा जेंव्हा शत्रूंचे सैन्य तुमच्या विरुध्द उभे ठाकले तेंव्हा आम्ही वादळी वारे आणि सैन्य पाठविले ज्यांना तुमचे उघडी डोळे बघु शकत नव्हते. तुमच्या प्रत्येक कृतीला (कार्याला) अल्लाह बघत होता. *(सूरेअहज़ाब-९)*

अशा प्रकारे दुष्टांचा नायनाट करण्यास अल्लाहने मुहम्मद (स.) यांचे मदतीसाठी फरिश्ते आणि सैन्य पाठविले.

३) जगतपति :- पति हा शब्द 'पा' (रक्षा करणे) या धातुमधे उति 'प्रत्यय' च्या संयोगाने बनला आहे. 'जगत' या शब्दाचा अर्थ होतो 'विश्व' (संसार) म्हणजे 'जगतपति' या शब्दाचा अर्थ झाला 'विश्वाचे रक्षण करणारा' भागवत पुराणात अंतिम अवतार 'कल्कि' ला 'जगत्पति' सुध्दा म्हटले आहे.[१]

प्रेषित मुहम्मद (स.) जगतपति[२] आहेत, कारण त्यांनी पतनशील समाजाचे रक्षण केले. त्याला सन्मार्ग दाखविला. आपण संपुर्ण विश्वाच्या मानवासाठी ईश्वराचा संदेश आणला होता. पवित्र कुरआन सागंतो

---

१) भागवत पुराण, द्वादश स्कंध, द्वितीय अध्याय, १९ वा श्लोक
२) संस्कृतचे व्याकरणाचार्य वामन शिवराम आपटे यांनी 'पति' या शब्दाचा अर्थ प्रधानता करणारा सुध्दा सांगितले आहे. (संस्कृत हिंदी शब्दकोष पृष्ठ ५६८) मोतीलाल बनारसी दास पब्लीशर्स संस्करण १९८९ या प्रमाणे जगत्पति चा अर्थ होतो. जगाची प्रधानता करणारी व्यक्ती, महामान्य मुहम्मद (स.) ज्या धर्माला घेवुन आले होते ते वास्तविक बघता मानव जीवनाच्या अगदी आरंभापासुन विद्यमान (उपलब्ध) होता परंतु मुहम्मद (स.) पैगंबरांद्वारे त्यातील मानविय दोषारोपण दूर करून शुध्द करण्यात आले व त्याला पुर्णता आणि प्रधानता बहाल करण्यात आली. प. कुरआन मधे अल्लाह घोषणा करतो की, ''आज मी तुमच्यासाठी (मानवजातीसाठी) तुमच्या 'दीन' ला (जीवन पध्दती) पूर्ण केले आणि तुमच्यावर माझे बक्षीसाची पूर्णता केली आणि इस्लामला तुमच्यासाठी 'दीन' (धर्म) म्हणुन पसंत केले'' (मान्य केले) (५:३) अल्लाहच्या पैगंबरांनी जगात सत्याला प्राधान्य दिले, त्याचा प्रचार प्रसार केला आणि लोकांना स्वत: सत्यावर आचरण करण्यास व लोकांपर्यंत सत्य पोहोचविण्यास प्रेरित केले. आपल्या द्वारे सत्कर्मांना प्राधान्य मिळाले. शील स्वभाव व नैतिकतेची पूर्तता झाली. एक हदीस मधे आपण सांगितले की ''अल्लाहने मला नैतिकतेला व सत्कृत्याच्या पुर्ततेसाठी पाठविले आहे.' (शरहुरसुन्नह)

"हे मुहम्मद (स.) घोषणा करा की, तुम्ही संपुर्ण विश्वासाठी अल्लाहचे प्रेषित म्हणून आला आहात"[1]

एका अन्य जागी कुरआन स्पष्टोक्ती आहे,

"अत्यंत समृध्दशाली आहे तो ज्याने आपल्या दासावर सत्य व असत्य यांना वेगळे करून स्पष्ट करणारा ग्रंथ कुरआन अवतरित केला जो संपुर्ण विश्वाला पापकृत्यांची भिती दाखविणारा (खबरदार करणारा) आहे."[2]

४) चार भावाचा सहयोग :- कल्कि पुराणानुसार चार भावा सोबत कल्कि कलिचे (सैतान) निवारण करेल.[3] महामान्य मुहम्मद (स.) सोबत सैतानाला नष्ट करण्यास जे चार (४) प्रमुख सहकारी होते त्यांची नावे अशी होय.

१) हजरत अबु बक्र (र.)
२) हजरत उमर (र.)
३) हजरत उस्मान (र.)
४) हजरत अली (र.)

५) अंतिम अवतार :- कल्किला अंतिम युगाचा अंतिम अवतार सांगितले आहे.[4] महामान्य मुहम्मद (स.) यांनी सुध्दा घोषणा केली होती की, मी अंतिम रसूल आहे.

कल्कि शब्दाचा अर्थ 'वाचस्पत्यम' आणि 'शब्दकस्यतरु' मध्ये अनार (डाळींब) चे फळ खाणारा आणि कलंक धुणारा असा सांगण्यात आला आहे. पैगंबर मुहम्मद (सल्लम) हे अनार (डाळींब) आणि खजुराची फळे खात असत तसेच प्राचीन काळातील एकेश्वरवादात झालेले काल्पनिक देवांचे मिश्रण (अनेकेश्वरवाद/शिर्क) आणि नास्तिकतेला धुवून काढले.[5]

६) उपदेश आणि उत्तरेकडे प्रस्थान :- कल्कि जन्माला आल्यानंतर डोंगराळ भागात किंवा पहाडात जाऊन परशुरामजी कडून ज्ञान प्राप्त करेल. या

---

१) कुरआन सुरह (अध्याय) आराफ, आयत नं. १५८
२) प. कुरआन सुरह फुरकान आयत नं. १
३) चतुर्भिर्भ्रातृभिर्देव करिष्यामि कलिक्षयम (कल्कि पुराण अध्याय २ श्लोक ५)
४) भागवत पुराणाच्या २४ अवतारामधील प्रकरणात कल्कि सर्वात अंतिम अवतार आहे. (भा. पुराण प्रथम स्कंध, तृतीय अध्याय २५ वा श्लोक)
५) कल्कि अवतार और मुहम्मद साहब पृष्ठ ४१

नंतर उत्तर दिशेला जाऊन परत येईल. महामान्य मुहम्मद (स.) जन्मानंतर काही दिवसांनी पहाडांच्या दिशेने गेले व तेथेच जिब्रील (अ.) या देवदुताकडून (फरीश्ता) अल्लाहचे ज्ञान त्यांना प्राप्त झाले. तेथुन आल्यानंतर ते उत्तरेकडे मदीनेत गेले व तेथुन पुन्हा दक्षिणेत येवुन विजय प्राप्त केला. पुराणात कल्कि - विषयी असे लिखाण सुध्दा करण्यात आलेले आहे.

७) आठ सिध्दी आणि गुणांनी संपन्न :- कल्कि अवताराला भागवत पुराणच्या १२ व्या स्कंधातील दुसऱ्या अध्यायात 'अष्टैश्वर्यगुणान्वित' (म्हणजे-आठ ईश गुणांनी युक्त किंवा संपन्न) सांगितले आहे. या आठ ईश्वरीय सद्-गुणांचा उल्लेख महाभारततातही आला आहे.[१] ही गुण-वैशिष्ठयें.

१) तो महान ज्ञानी असेल
२) तो उच्च-कुलीन वंशाचा असेल
३) तो आत्मनियंत्रक असेल
४) तो श्रुतज्ञानी असेल
५) तो पराक्रमी असेल
६) तो अल्पभाषी असेल
७) तो दानशूर असेल
८) तो कृतज्ञ असेल

उपरोक्त दैवी गुणांशी महामान्य मुहम्मद (स.) यांचे जीवनाचे साम्य बघुया -

महामान्य मुहम्मद (स.) महान ज्ञानी आणि दिव्य दृष्टीचे स्वामी होते. आपण भूतकाळातील तसेच भविष्यातील बऱ्याच घटनांचा उल्लेख केला आणि त्या सर्व तंतोतंत व अगदी खऱ्या सिध्द झाल्या.

या आधी आम्ही सांगितलेच आहे की रोमियांचा प्रथम पराजय व नंतर विजयाची मुहम्मद (स.) व यांनी केलेली भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली. आपल्या दुरदर्शिता व तत्वदर्शितेची असंख्य उदाहरणे आहेत जी आपल्या उच्च-कोटीच्या विद्वतेला सिध्द करतात.

---

१) अष्टौगुणा: पुरुषं दिपयन्ति, प्रज्ञा च कौल्यंच दम श्रृतंच ।
पराक्रमश्चा ब्रहुभाषिता च, दानं यथाशक्ति कृतज्ञता च । (महाभारत)

महामान्य मुहम्मद (स.) ज्या वंशात जन्माला आले होते ते वंश अरब देशातील कुलीन वंशापैकी होते. आपला जन्म ५७१ इ.स.वी. मधे कुरैश-कबील्यातील हाशिम परिवारात झाला जो अरब लोकांमधे प्रतिष्ठित आणि काबाचा संरक्षक होता.

मुहम्मद (स.) यांना इंद्रियावर नियंत्रणाचा ईश्वरीय गुण सुध्दा प्राप्त होता, आपण दयावान, शांत, जितेंद्रिय आणि उदार होते.[१]

मुहम्मद (स.) श्रुतीज्ञानी सुध्दा होते. 'श्रुत' या शब्दाचा अर्थ आहे, 'जे ईश्वराद्वारे ऐकविले गेले आणि ऋषि द्वारे ऐकण्यात आले.' महामान्य मुहम्मद (स.) कडे जिबरील (अ.) नामक फरिश्त्या द्वारे ईश्वरीय ज्ञान पाठविण्यात आले (अवतरित झाले). 'लेनपूल' आपली पुस्तक "Introduction, speeches of Mohammad' मधे लिहतात की, मुहम्मद (स.) यांच्याकडे देवदुता मार्फत ईश्वरीय ज्ञान पाठविण्यात येत होते हे निसंशय सत्य आहे. सर विलीयम म्युर लिहतात, मुहम्मद (स.) ईश संदेष्टा आणि ईश्वराचे (अल्लाहचे) प्रतिनिधी होते.[२]

वर उल्लेखित अष्टगुणां मधे पराक्रम पाचवा गुण आहे. महामान्य मुहम्मद (स.) अतिशय पराक्रमी होते. डॉ. वेद प्रकाश उपाध्याय मुहम्मद (स.) यांच्या पराक्रमाचे वर्णन करून लिहतात की, 'एकदा एका गुफेत कुरैशच्या रूकाना पहलवानला मुहम्मद (स.) यांनी ईश्वराची भिती न बाळगण्याचे आणि ईश्वरावर श्रध्दा न ठेवण्याचे कारण विचारले असता तो म्हणाला मला सत्याचे प्रमाण द्या. यावर मुहम्मद (स.) बोलते झाले की, तु अतिशय पराक्रमी वीर आहे जर मी कुश्तीत तुला पछाडले तर काय तु विश्वास बाळगशील ? त्याने होकार दिला. तेव्हा मुहम्मद (स.) यांनी त्याला पछाडले. ''रहमतुललिल आलमीन'' या प्रसिध्द पैगंबर जीवनी ग्रंथामधे 'शिफा' नामक पुस्तकाच्या ६४ व्या पानावर 'अल्लामा काजी मंसूरपुरी' लिहतात की मुहम्मद (स.) यांनी त्या पहलवानाला सलग ३ वेळा पछाडले परंतु तरीही त्याने आपणास पैगंबर मानले नाही आणि ईश्वराच्या सत्येवर श्रध्दा ठेवली नाही.

---

१) Modesty and kindliness, Patience, self deanial and riveted the affections of all around him, Page. 525 : 'Life of Mohamed' by - Sir Willaim Muir.

२) He was now the servent, the propbet, the vice gerent of God.

अल्पभाषी हा विशिष्ट गुण सुध्दा मुहम्मद (स.) यांच्या अंगी होता. आपण मौन रहायचे परंतु जे बोलत होते ते इतके ओजस्वी आणि प्रभुत्वशाली असायचे की लोक आपले कथन विसरत नव्हते.[१]

दानशुरता महापुरुषांचे प्रमुख वैशिष्ठ असते. महामान्य मुहम्मद (स.) या बाबतीत अग्रेसर होते. आपल्या घरी गरीबांच्या रांगा लागलेल्या असायच्या. आपल्या जवळुन कधी कुणीही नैराश्य घेवुन परतला नाही.

आपल्या अंगी अपार कृतज्ञता होती. ते कोणाचेही उपकार विसरत नव्हते. अंसार (मदीनेतील मदतनीस) विषयी आपण काढलेले उदगार आपल्या कृतज्ञतेचा ज्वलंत पुरावा होय.[२] अशा प्रकारे महामान्य मुहम्मद (स.) आठही ईश गुणांच्या कौशल्याने संपन्न होते हे निर्वीवाद सिध्द होते.

८) शरीरातून सुगंध निघणे :- भागवत पुराणात भविष्यवाणी करण्यात आली आहे की, कल्किच्या शरीरातुन लोकांची मने मोहणारा सुवास निघेल. त्यांच्या शरीरातील सुगंध हवेत मिसळून लोकांची मने निर्मळ करेल.[३] शिमाईल तिर्मीजी या ग्रंथात आहे की, मुहम्मद (स.) ज्यांचे हस्तालोंदन (हात मिळविणे) करायचे त्यांच्या हातातही हा सुगंध दिवसभर रहायचा.[४]

एक वेळ उम्मे सुलैत यांनी महामान्य मुहम्मद (स.) यांचा घाम एकत्रित केला. आपणास याचे कारण विचारले असता त्या म्हणाल्या आम्ही याला अत्तरामधे मिसळतो. कारण याचा सुवास सर्व सुगंधापेक्षा जास्त मोहक आहे.

९) चमकदार तेजस्वाचे धनी :- भागवत पुरानानुसार कल्कि तेजस्वी स्वरुपाचा स्वामी असेल.[५] बुखारी शरीफ च्या हदीसान्वे मुहम्मद (स.) सर्व लोकांमधे

---

१) Introduction 'The speeches of Mohammed', - by Lane Port Page 24.

२) असह उस सियर, पान ३४३

३) अथ तेषां भविष्यन्ति मनांसि विशदानि वै ।
वासु देवांगरागती पुण्यगंधानिल स्पृशाम । (भागवत पुराण द्वादश स्कंध द्वितीय अध्याय २१ वा श्लोक)

४) शिमाइल-ए-तिरमीजी पान नं. २०८ अनुवाद मौलाना मुहम्मद जकरिया

५) विचारन्नाशुना क्षोण्या ह्येनाप्रतिमद्युतिः । नृपलिंगच्छदो दस्युन्कोटिशोनिहनिष्यति॥
(भागवत पुराण द्वादश स्कंध द्वितीय अध्याय २० वा श्लोक)

जास्त सुंदर आणि आदर्शवान योध्दा होते.[१] सर विलीयम म्युरच्या मते महामान्य मुहम्मद (स.) अतिशय तेजस्वी चेहायाचे धनी तसेच पराक्रमी व दानशुर होते.[२]

१०) ईश-वाणी चा उपदेशक :- 'कल्कि अवतार और मुहम्मद साहब' या पुस्तकाच्या पान नं. ५०,५१ वर डॉ. वेद प्रकाश उपाध्याय लिहतात की, कल्कि विषयी भारतामधे ही गोष्ट प्रसिध्द आहे की ते जो धर्म स्थापित करतील तो वैदीक धर्म असेल. ते जो उपदेश देतील ती शिकवण ईश्वरीय असेल. महामान्य मुहम्मद (स.) द्वारे प्रस्तुत कुरआन ईश्वरीय वाणी आहे हे अगदी निर्वीवाद सत्य आहे. हठधर्मी लोक या सत्याला मान्य करो, अथवा न करो. सत्य ते सत्यच. पवित्र कुरआन मधे नीतिमत्ता, सदाचार, प्रेम, उपकार इत्यादि करण्यास जे प्रेरणा स्रोत सांगितले आहे तेच वेदातही उपलब्ध आहे. पवित्र कुरआन मुर्ति पुजेचे खंडण करतो आणि एकेश्वरवाद (शुध्द आणि सर्वव्यास तौहीद) ची शिक्षा सोबत परस्पर प्रेमाचा व्यवहार करण्याचा उपदेश देतो. वेदात 'एकम सत्' आणि विश्व बंधुत्वाची घोषणा केली आहे. वेदामधे ईश्वर भक्तीचा आदेश आहे. प. कुरआनच्या आदेशान्वये अधिक तर मुसलमान दिवसातून पाच वेळा नमाज अवश्य पढतात.

योगा-योगाने येथे ही गोष्टही स्पष्ट होत आहे की, वेद आणि कुरआनच्या पुष्कळशा मार्गदर्शनात समानता आहे. उदाहरण स्वरूप वेद, गीता आणि स्मृति मधे एकाच ईश्वराच्या भक्तीचा आदेश आहे. आपण केलेल्या दुष्कृत्यांची क्षमा मागण्यास त्याच एका ईश्वराची प्रार्थना करण्याचा आदेश आहे. - प. कुरआन सांगतो, ''ए नबी ! (तुम्ही) सांगा मी तर केवळ तुमच्या सारखाच मनुष्य आहे, माझ्याकडे प्रकाशना (ईशवाणी) केली जाते की, तुमचा पुजनिय एकटा अल्लाह आहे, तर तुम्ही सरळ त्याच्याकडे फिरा आणि क्षमा सुध्दा त्याच्याशीच मागा.[३] डॉ. उपाध्यायजी सांगतात की, कल्कि आणि मुहम्मद (स.) यांच्यात मला जे अभूतपूर्व साम्य आढळले त्याला बघुन मी आश्चर्यचकित झालो. आम्ही भारतीय ज्या 'कल्कि' च्या प्रतिक्षेत आहोत ते तर महामान्य मुहम्मद (स.) यांच्या रुपात आले आहेत.[४]

---

१) हजरत अनस (रजि.) यांच्या द्वारे उदधृत- जमऊल फवायद पान नं. १७८

२) 'He was' says an admiring followen, the handsomest and bravest, the bright faced and most generous of men. (The Life of Mohanmad Page 523)

३) ''हा. मीम अस सजदा'' आयत नं. ६१ (कुरआन)

४) 'कस्कि अवतार और मुहम्मद साहब' (पान नं. ५९)

उपनिषद आणि मुहम्मद (स.)

भारतीय धर्माचे एक महत्वपूर्ण अंग उपनिषधे होय. ही उपनिषधे सुध्दा महामान्य मुहम्मद (स.) यांची चर्चा अनेक जागी करतात. नागेंन्द्र नाथ बसु यांनी संपादित केलेल्या विश्वकोषाच्या द्वितीय खंडात उपनिषदातील त्या श्लोकांचे वर्णन आढळुन येते. ज्यांचा संबंध इस्लाम आणि मुहम्मद (स.) यांच्याशी आहे. यामधील काही श्लोक अर्थासह येथे प्रस्तुत करीत आहेत म्हणजे पाठकांना वास्तविकता कळेल. (म्हणजे महामान्य मुहम्मद (स.) केवळ मुसलमानांचेच किंवा अरबचेच (भांषातरकार).

अस्माल्लां इल्ले मित्रावरूणा दिव्यानि धत्त ।
इल्लल्ले वरूणो राजा पुनर्दुदः ।
ह्या मित्रो इल्लां इल्लल्ले इल्ला वरूणो मित्रतेजस्कामः ॥१॥
होतार मिन्द्रो होतार मिन्द्र महासुरिन्द्राः
अल्लो ज्येष्ठं श्रेष्ठं परमं पुर्ण ब्रह्माणं अल्लाम् ॥२॥
अल्लो रसूल महामद रकबरस्य अल्लो अल्लाम् ॥३॥

(अल्लोपनिषध - १,२,३)

अर्थात - ''या देवाचे नाव अल्लाह आहे. तो एकच एक आहे. मित्रा वरून इत्यादि त्याची वैशिष्टे आहेत. वास्तविक अल्लाह वरूण आहे जो संपूर्ण सृष्टीचा बादशहा आहे. मित्रांनो ! त्या अल्लाहला आपला पूज्य (पूज्यनिय) समजा. तो वरूण आहे आणि एका मित्राप्रमाणे सर्व लोकांची (बिघडलेली) कामे बनवितो. तो इंद्र आहे, श्रेष्ठ इंद्र, अल्लाह सर्वात मोठा, सर्वापेक्षा श्रेष्ठ (महान), सवपिक्षा अधिक पूर्ण आणि सर्वा पेक्षा जास्त पवित्र आहे. मुहम्मद (स.) अल्लाहचे श्रेष्ठतम रसूल (पैगंबर) आहेत. अल्लाह आदि, अंत आणि संपूर्ण जगाचा पालनहार आहे. सगळी चांगली सत्कर्मे अल्लाहसाठीच आहे. वास्तविक अल्लाहनेच सूर्य, चंद्र आणि ताऱ्यांना निर्माण केले आहे.''

उपरोक्त श्लोक अगदी स्पष्टपणे या निर्वीवाद सत्याची साक्ष देत आहे की सर्व शक्तीमान जगाचा पालनहार केवळ एकच-एक अल्लाह आहे आणि महामान्य मुहम्मद (स.) त्याचे पैगंबर (संदेश वाहक) आहेत.

उपनिषधांच्या अन्य श्लोकातही इस्लाम आणि मुहम्मद (स.) विषयी समानता दर्शविणारे श्लोक उदघृत झाले आहेत. या उपनिषधा मधे पुढे सांगितले आहे की,

''आदल्ला बुक मेककम् । अस्लबुक निखादकम ॥४॥
अलो यज्ञेन हुत हुत्वा अल्ला सूर्य्य चंद्र सर्व नक्षत्राः ॥५॥
अल्लो ऋषींणा सर्व दिव्यां इन्द्राय पूर्व माया परमन्तरिक्षा ॥६॥
अल्लः पृथिव्या अंतरिक्ष्नं विश्वरूपम ॥७॥
इल्लांकबर इल्लांकबर इल्ला इल्लेति इल्लाः ॥८॥
ओम अल्ला इल्लला अनादि स्वरुपाय अथर्वण
शामाहुही जनान पशुन सिध्दान जलवरान अदृष्टं कुरू कुरू फट ॥९॥
असुर-संहारिणी हं ह्रीं अल्लो रसुल महमदरकबरस्य
अल्लो अल्लाम् इल्लेति इल्लला ॥१०॥ (इति-अल्लोपनिषध)

अर्थात - ''अल्लाह ने सर्व ऋषि (पैगंबर) पाठविले आणि सूर्य, चंद्र व सर्व नक्षत्रांना निर्माण केले. त्यानेच सकल ऋषि पाठविले आणि आकाशाला निर्माण केले. अल्लाहनेच हे अख्खे ब्रम्हांड बनविले. श्रेष्ठ केवळ अल्लाहच आहे त्याच्या शिवाय कुणीही पुजेस पात्र नाही. हे पुजारी ! सांगुन टाक, अल्लाहच्या व्यतिरिक्त कुणीही पूज्य नाही. अल्लाहच अनादि (काळापासून) आहे. तोच संपूर्ण विश्वाचा पालकर्ता आहे. तोच संपूर्ण दुष्कृत्यांना आणि संकटांचे हरण करणारा आहे. मुहम्मद अल्लाहचे रसुल (पैगंबर) आहेत, जो (तो अल्लाह) संपूर्ण सृष्टीचा पालनहार आहे. अतहः तुम्ही ही घोषणा करा कि, अल्लाह केवळ एकच-एक आहे आणि त्याचे शिवाय दुसरा कुणीही पुजनिय नाही.''[१]

---

१) आर्य समाजाचे काही मोजके विद्वान अल्लोपनिषद् ची गणणा उपनिषधामधे करीत नाही परंतु यासाठी त्यांच्या जवळ तर्क शुध्द व ठोस प्रमाणही नाही, म्हणुनच हिन्दु-धर्माचे अधिकतर (बहुसंख्य) विद्वान आणि मनीषी यांच्या आग्रहाकडे लक्ष देत नाही. गोरखपुरची 'गीता प्रेस' हिन्दु धर्माच्या प्रामाणिक प्रकाशनामधे अग्रगण्य आहे. येथुनच प्रामाणिक समजल्या जाणारे 'कल्याण' नामी मासिक हिन्दी भाषेत प्रकाशित होते. याचीच विशेष प्रस्तुति ''उपनिषद अंका'' मधे २२० उपनिषदांची सुची देण्यात आली आहे. या क्रमाकांत १५ क्रमांकावर 'अल्लोपनिषद' चा उल्लेख आहे. १४ नंब्रर वर 'अमत बिन्दुपनिषध तर १६ व्या क्रमांकावर 'अवधुतोपनिषध' (पद्य) चा उल्लेख आला आहे. डॉ. वेद प्रकाश उपाध्याय 'अल्लोपनिषद' ला प्रामाणिक उपनिषध मान्य करतात. (बघा, वैदिक साहित्य, एक विवेचन, प्रदीप प्रकाशन, पान नं. १०१, १९८९ चे संस्करण)

प्राणनाथी (प्रणामी) सांप्रदायाची साक्ष

हिन्दु-धर्मातील वैष्णवी समुदायामधे प्राणनाथी संप्रदाय उल्लेखनिय आहे. या सांप्रदायाचे संस्थापक व प्रवर्तक महामति प्राणनाथजी होते. यांचा जन्म इसवी सन १६१८ ला गुजरात प्रांतातील जामनगर शहरात झाला. यांचे जन्माचे नाव मेहराज ठाकूर असे होते. त्यांनी मनुष्यांना एकेश्वरवादाची शिक्षा दिली. त्यांनी निराकार ईश्वराच्या पूजे व भक्तीवरच भर दिला. त्यांनी पैगंबर म्हणजेच ईशदूतत्वाच्या धारणेचेच समर्थन केले आणि यालाच योग्य ठरविले.

प्राणनाथजी म्हणतात,

''कै वडे कहे पैगमंर पर एक महमंद पर खतम''।

अर्थात - ''धर्म ग्रंथात अनेक पैगंबरांचे महत्व आले आहे परंतु मुहम्मद (स.) साहेबांवर ईशदुतांची (पैगंबरांची) श्रृंखला समाप्त झाली. रसुल मुहम्मद (स.) अंतिम पैगंबर झालेत.''[१]

प्राणनाथजी एका जागी असे लिहतात -

''रसुल आवेशा तुम पर, ले मेरा फुरमान ।

आये मेरे अरस की, देखी सब पेहेचान''॥

अर्थात - (ईश्वर ने सांगितले) माझा रसुल मुहम्मद तुमच्या कडे माझा संदेश घेवुन येईल. तो जगात येवुन तुम्हाला माझे अर्श अथवा परमधामाची प्रत्येक दृष्टीने ओळख होण्यास काही संकेत देईल.[२]

१) मारफ़त सागर, पान नं. ३९ श्री प्राणनाथ मिशन नई दिल्ली
२) मारफ़त सागर, पान नं. १९ श्री प्राणनाथ मिशन नई दिल्ली

बौध्द धर्मग्रंथ आणि महामान्य मुहम्मद (स.)

अंतिम बुध्द-मैलेय आणि मुहम्मद (स.)

बौध्द धर्माच्या भाषेत ऋषिला 'बुध्द' म्हणतात. महात्मा गौतम बुध्दांनी मृत्यु समयी आपले प्रिय शिष्य आनंदाला सांगितले की, "हे नंदा! या जगात मी काही प्रथम बुध्द नाही तसेच मी अंतिम बुध्द ही नाही. या विश्वात सत्य आणि परोपकाराची शिकवण देण्यास आपल्या समयी एक बुध्द येईल. तो पवित्र अंतकरण आणि शुध्द हृदयाचा स्वामी असेल. ज्ञान आणि बुध्दीने संपन्न सर्व लोकांचा नायक होईल. ज्या प्रकारे मी लोकांना अमिट सत्याची शिकवण दिली त्याच प्रकारे तो सुध्दा विश्वाला सत्याची शिकवण देईल. जगाला तो असा जीवन मार्ग दाखवेल जो शुध्द आणि अगदी पुर्ण असेल. हे नंदा ! त्याचे नाव मैत्रेय राहील."[१]

'बुध्द' चा अर्थ 'बुध्दि ने संपन्न' होतो. बुध्द-मनुष्यच असतात, देवता नव्हे.[२] 'मैत्रेय' चा अर्थ 'दयेने युक्त' (संपन्न) असा होतो. बौध्द ग्रंथात ज्या अंतिम बुध्दि मैत्रेयच्या येण्याची भविष्यवाणी आहे ती 'अंतिम मैत्रेय' मुहम्मद (स.) यांनाच सिध्द करते.

'मैत्रेयची मुहम्मद (स.) यांच्याशी साम्यता

अंतिम बुध्द मैत्रेय मधे बुध्दाच्या सर्व विशेषता आढळणे अगदी स्वाभाविक आहे.

बुध्दाच्या प्रमुख विशेषता अशा प्रकारे आहेत.

१) तो ऐश्वर्यवान आणि धनवान राहील.

२) त्याला अपत्ये (मुले) राहतील.

३) तो स्त्री आणि शासन युक्त असेल.

---

१) Gospel of Buddha, by - Carus - Page 217.

२) It is only a human being that can be a Buddha, a deity can-not (Mohammad in the Buddist scriptres, Page1)

४) तो आपल्या पुर्ण आयुष्यापर्यंत जगतो.[१]

५) तो आपले काम स्वत: करतो.[२]

६) बुध्द केवळ धर्म प्रचारक असतात.[३]

७) बुध्द जेव्हा एकांतात राहतात तेव्हा ईश्वर त्याचे सहकाऱ्याच्या रुपात देवांना पाठवितो.[४]

८) संसारात (जगात) एका वेळी एकच बुध्द असतो.[५]

९) बुध्दाचे अनुयायी इतके दृढ असतात की त्यांना कुणीही विचलीत करू शकत नाही.[६]

१०) त्याचा कोणी गुरू नसेल. [७]

११) प्रत्येक बुध्द आपल्या पुर्वीच्या बुध्दाचे स्मरण व समर्थन करतो. आपल्या अनुयायींना 'मार' पासून बचाव करण्यास चेतावनी देतो किंवा प्रेरित करतो.[८] 'मार' म्हणजे दुष्कृय आणि विनाशक कार्याचा प्रसार करणारा सैतान होय.

१२) सामान्य माणसापेक्षा बुध्दांच्या मानेचे हाड अतिशय दृढ व ताठ असते त्यामुळे ते मान फिरवित असताना पुर्ण शरीरालाच फिरवितात जसे हत्ती फिरवितो.

या व्यतिरिक्त मैत्रेय ला दयाळु आणि बोधीवृक्षा खाली सभा आयोजित करणार ही सांगितले आहे.

---

१) Warren Page 79

२) The Dhammapada, SBE Volume x Page 67

३) The Tathagatas are only Preachers (The Dhammapada, SBE Volume x Page 67)

४) Saddharma Pundrika, SBE Volume XXI Page 225

५) The Life and Teaching of Buddha, Angarika Dhammapada Page 84.

६) Dhammapada S.B.E. Volume X Page 67

७) Romantic Hystory of Buddha, by Beal Page 241

८) Dhammapada S.B.E. Volume XI Page 64

डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांनी हे सिध्द केले आहे की, उपरोक्त सर्व वैशिष्ठे महामान्य मुहम्मद (स.) यांच्या जीवनात आढळुन येतात. तात्पर्य हेच की उपाध्यायजी यांच्या मते अंतिम बुध्द मैत्रेय प्रेषित मुहम्मद (स.) हेच होय यात शंका नाही. यांनी या विषयी प्रस्तुत केलेले तथ्य आम्ही येथे जशेच्या तशे प्रस्तुत करीत आहोत.

'पवित्र कुरआन मधे मुहम्मद (स.) साहेब ऐश्वर्यवान आणि धनवान होण्याविषयी ही ईशवाणी आहे की, ''तुम्ही या पुर्वी निर्धन होते आम्ही तुम्हाला धनी बनविले.'' मुहम्मद (स.) साहेबांना अल्लाहचे प्रेषित्व मिळण्या आधीच ते धनी झाले होते.[१] मुहम्मद (स.) साहेबांजवळ अनेक घोडे होते. त्यांच्या वाहनाच्या रूपात असलेल्या प्रसिध्द उंटनीचे नाव 'अलकसवा' होते. याच उँटनीवर बसुन आपण मक्का ते मदीनेचा प्रवास केला होता. आपल्या जवळ जवळपास २० उँटण्या होत्या. यांचे दुध आपल्या मुला-बाळांच्या आहारासाठी पर्याप्त होते. हेच दुध येणाऱ्या अतिथीगणांच्याही उपयोगी पडत असे. याशिवाय आपल्याकडे ७ बकऱ्याही होत्या. यांचे दुधही आपले एक साधन होते. मुहम्मद (स.) साहेब दुधासाठी म्हशी ठेवत नसत कारण अरब मधे म्हशी होत नसत.[२] त्यांच्याजवळ खजुरांची सात बागे होती जी आपण अल्लाहच्या मार्गात धार्मिक कार्यासाठी दान केलीत. मुहम्मद (स.) साहेबांजवळ जमीनही होती. आपल्या अधिकारात विहरी सुध्दा होत्या. अरब हा वाळवंटी भू-भाग असल्यामुळे विहीर फार मोठी संपत्ती समजल्या जात असे. मुहम्मद (स.) साहेबांच्या १२ धर्मपत्नी, चार मुली आणि तीन मुले असा परिवार होता. बुध्दाला पत्नी आणि मुले असणे हा द्वितीय गुण आहे. मुहम्मद (स.) साहेबांपूर्वीच्या बुध्दात हा गुण परिपूर्ण नव्हता. परंतु मुहम्मद (स.) साहेबांजवळ हा गुण १२ पटीने विद्यमान होता.[३]

महामान्य मुहम्मद (स.) साहेबांनी शासन सुध्दा केले. आपल्या जीवन काळातच मोठ-मोठ्या राजा-महाराज्यांना पराजित करून आपले

१) 'व-व-ज-द-क-आ-इलन फअग्ना' (और तुमको निर्धन पाया, बादमे तुमको धनी कर दिया. (आणि/आधी) तुम्ही निर्धन होता आम्ही तुम्हाला धनी केले.)

२) Life of Mohommed - Sir willian Muir (cambridge Edition) Page 545-54

३) Life of Mohommed-Sir willian Muir (cambridge Edition) Page 547.

प्रभुत्व स्थापित केले. अरब देशाचे सम्राट झाल्यावर सुद्धाही त्यांचा आहार अगदी पुर्वीसारखाच होता.[१]

मुहम्मद (स.) साहेब आपले आयुष्याच्या अंतापर्यंत जगले. अल्पायु मधे आपले देहावसन झाले नाही किंवा आपणास अपघाती मृत्यु आला नाही.

मुहम्मद (स.) साहेब आपले काम स्वतःच करायचे.' त्यांनी पूर्ण आयुष्य सत्य धर्माचा प्रचार केला. त्यांच्या धर्म प्रचारक स्वरूपाची साक्ष अनेक इतिहासकारांनी दिली आहे.[२]

मुहम्मद (स.) साहेबांनी सुध्दा आपल्या पुर्वीच्या ऋषिंचे समर्थन केले आहे. यासाठी प. कुरआनचे द्वितीय अध्याय बघावे. यात घोषणा करण्यात आली आहे की, "हे श्रध्दावंतानो (मुस्लिम) ! तुम्ही घोषणा करा की, आम्ही अल्लाहवर पुर्ण आस्था बाळगतो आणि जो ग्रंथ आमच्यावर अवतरित झाला आहे त्याच्यावर तसेच जे-जे इब्राहिम, इस्माईल आणि याकूब व त्यांची संतती (ऋषि) वर आणि जे काही मुसा व ईसा यांना देण्यात आले त्यांचेवर तसेच सर्व ऋषि ज्यांना त्यांच्या पालनकर्त्या कडुन मिळाली या सर्वांवर आम्ही आस्था बाळगतो. आणि या ऋषि समुहामधे कोणतेही अंतर करीत नाही आणि आम्ही त्याच एकट्या ईश्वरावर श्रध्दा बाळगणारे आहोत.[३]

मुहम्मद (स.) साहेबांनी आपल्या अनुयायींना सैतानापासुन सावध राहण्यास वारंवार सांगितले. पवित्र कुरआन मधे सैताना-पासुन सुरक्षित व सावध राहण्यास जागो-जागी बजावण्यात आले आहे. सैतानाला मित्र बनविल्यास तो पथभ्रष्ट करेल आणि नरकीय मार्ग सुलभ व प्रशस्त करेल अशी स्पष्टोक्ती कुरआन ने केली आहे.[४]

---

१) The fare of the desert seemed most congenial to him, even when he was sovereign of Arabia. (The speeches and table talk of the phrophet Mohammed - by - Lane Poole.)

२) Mohammad and Mohammadenision - by - Bosworth smith, Page 98.

३) प. कुरआन सुरा (अध्याय) नं. २ आयत १३६

४) प. कुरआन सुरा नं. २२, (आयत ४)

मुहम्मद (स.) साहेबांचे अनुयायी विचलीत न होता आपण दाखविलेल्या मार्गांवर आचरणास कटीबध्द होते. मुहम्मद (स.) साहेबांच्या अनुयायांनी असह्य कष्टदायक त्रासात ही प्रेषित आदेशांना व प्रेमाला सर्वोपरी ठेवले. जगात मुहम्मद (स.) साहेबा-व्यतिरिक्त दुसरा बुध्द नव्हता. मुहम्मद (स.) साहेब ज्या काळात (बुध्दाच्या पैगंबर) पदावर नियुक्त झाले तेंव्हा संपुर्ण जगाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली होती.

मुहम्मद (स.) यांचा कोणताही सांसारिक व्यक्ती गुरू नव्हता. आपण निरक्षर म्हणून प्रसिध्द होते. ईश्वरद्वारा मुहम्मद (स.) यांच्या हृदयावर अवतरित आयतीचा संग्रह पवित्र कुरआन होय. बुध्दासाठी बोधी वृक्षाचे होणे आवश्यक आहे. कोणासाठी बोधी वृक्षाच्या रूपात अश्वत्थ (पींपळ) तर कोणासाठी न्यग्रोध (बरगद) तर कोणासाठी उदुम्बर (गुलर) होता. अंतिम बुध्दासाठी जो बोधिवृक्ष सांगण्यात आला आहे तो एक (ठीसूळ) कठीण आणि भारयुक्त काष्ठाचे म्हणजे वजनदार लाकडाचे वृक्ष होय.[१]

प्रेषित मुहम्मद (स.) साहेबांसाठी बोधीवृक्षाच्या रूपात हुदैबिया या जागी एक कठीण लाकडाचा भारदार वृक्ष होता. ज्याच्या खाली मुहम्मद (स.) साहेबांनी सभा सुध्दा घेतली होती.

'मैत्रेय' शब्दाचा अर्थ होतो 'दयावान' आक्टोबर १६ ईसवी सन १९३० च्या 'लीडर' मधील ७ व्या पानाच्या ३ ऱ्या कॉलम मधे एका बुध्दाने 'मैत्रेय' चा अर्थ 'दया' केला आहे. मुहम्मद (स.) साहेब दयेचे सागर होते. म्हणुनच त्यांना ''रहमतुललित आलमीन'' म्हणतात.[२] रहमत्तुललिल आलमीन चा अर्थ आहे संपुर्ण विश्वासाठी साक्षात 'दया'. (नराशंस और अंतिम ऋषि पृष्ठ ५४ ते ५८)

---

१) According to some of the Modern Buddhist scholars the Bo-tree of the Buddha Maiterya is the iron wood tree (Mohammad in the Buddhist scriptures Page 64)

२) प. कुरआन सुरा ११, आयत १०७ (हे मुहम्मद ! आम्ही तुम्हाला संपुर्ण जगासाठी दया बनवुन पाठविले)

स्वर्गीय बोधिवृक्ष अतिशय विस्तृत अशा क्षेत्रात आहे असे सांगण्यात येते की, बुध्द स्थिर दृष्टीने या बोधिवृक्षाला बघतो. प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्वर्गात एक वृक्ष बघितला जो ईश-सिंहासनाच्या उजव्या बाजुला होता. हा वृक्ष एवढ्या विशाल भागात होता की एक घोडास्वार १०० वर्षातही त्याच्या सावलीला ओलांडू शकत नसे.[१] प्रेषित मुहम्मद (स.) यांनी अगदी टक-टकी लावुन या स्वर्गीय वृक्षाला बघितले.

मैत्रेय विषयी हे सुध्दा सांगितले आहे की, कोणत्याही दिशेने वळत असता ते पुर्ण शरीरालाच त्या दिशेने फिरवतील (म्हणजे फक्त मान फिरवुन बघणार नाही.) मुहम्मद (स.) साहेब सुध्दा मित्राकडे अगर अनुयायीकडे बघतांना पुर्ण शरीर त्या दिशेने फिरवीत असत.[२]

अशा प्रकारे हे सिध्द होते की, बौध्द ग्रंथात ज्या अंतिम मैत्रेय च्या आगमनाची भविष्यवाणी केली आहे ते 'मैत्रेय' महामान्य मुहम्मद (स.) हेच होय.

---

१) In Paradise there is a tree (such) that a rider can not cross its shade Even in hundred years. (Mohammad in the Buddhist scriptures, Page 79)

२) It the turned in conversation to wards a friend he turned not partially but will his full face and his whole body. (The life of mohammad, by - Sir William Muin, Page 511, 512)

जैन धर्म आणि प्रेषित मुहम्मद (स.)

डॉ. पी. एच. चौबे लिहतात की,

"मी मुहम्मद (स.) यांना कल्कि अवतार मान्य करतो. पुराणात या अवताराचे (पैगंबर) वर्णन आहे. सांगण्यात आले आहे की कल्कि अवतार बुध्दावतारानंतर होईल. त्याचा जन्म शम्भल नगर येथील एका ब्राम्हण परिवारात (पुजारी वंशात) होईल. त्याची सवारी अगर वाहन घोडा आणि शस्त्र तलवार राहील. तो संपुर्ण विश्वात आपल्या सत्य धर्माला विजयी करेल. (जास्त माहीतीसाठी बघा - कल्कि पुराण)

जैन धर्माच्या ग्रंथकारांनी सुध्दा कल्कि अवताराची चर्चा करीत स्वामी महावीरांच्या निर्वाणाच्या १०००८ एक हजार वर्षानंतर या कल्किचा आगमन काळ सांगितला आहे. महावीर स्वामींचे निर्वाण वर्ष ५७१ ईसा-पूर्व मानला जातो. या अनुसार महामान्य मुहम्मद (स.) यांचा आगमन काळ हा जैन धर्माच्या ग्रंथकारांच्या कल्कि आगमनाचा भाकीत काळ होय. या शिवाय काही समानता ज्या जैन धर्मानुसार त्यांच्या कल्कि अवतारात आणि मुहम्मदांमधे आढळुन येतात.

प्रसिध्द जैन लेखक आपल्या 'हरीवंश पुराण' या धर्म ग्रंथात लिहतात की, महावीरांच्या निर्वाणाच्या ६०५ वर्ष व पाच (५) महिन्यांनी शक राज चा जन्म झाला व गुप्त संवत २३१ वर्षाच्या शासनानंतर कल्कि अवताराचा जन्म झाला. या संदर्भाचा श्लोक असा आहे.

" गुप्तांना चश्त द्वयम ।

एक विंवश्च वर्षणि कालविद् भिरूदा हतम ।।४९०।।

चित्वा रिंश देवातः कस्किराजस्य राजता ।

ततोऽ जिंटजयो राजा स्यादिन्द्रपुर संस्थितः ।।४९१।।

(जिनसेन कृत हरिवंश पुराण अ. ६०)

गुणभद्र या जैन विद्वान ग्रंथकारांनी उत्तर पुराणात लिहले आहे की, महावीर निर्वाणच्या १००० वर्षा नंतर कल्किराजचा जन्म झाला.

(Indian Antiquary vol. X v.p. 143)

सुप्रसिध्द विद्वान जैन ग्रंथकार 'नेमिचंद्र' आपल्या 'त्रिलोक सागर' मधे लिहतात की, ''शकराज निर्वाणाच्या ६०५ वर्ष व ५ महिन्यानंतर तसेच शककाल पासुन ३९४ वर्ष आणि ७ महिन्या नंतर कल्किराज चा जन्म झाला.''

''पणछस्सयं वस्संपण मासजंद गमिय वीर णिबुइ दो ।

सगराजो सो कल्कि चतुणवतिय महिप सगमासं ॥''

(त्रिलोकसागर पृष्ठ ३२)

उपरोक्त भाकीतांचे पक्षपात रहीत अध्ययन केल्यास आमच्या धर्माचार्यांनी ज्यांच्या विषयी सांगितले ते महामान्य मुहम्मद (स.) होय यात कोणतीही शंका-कुशंका राहत नाही.

ज्या प्रमाणे एका शासकाच्या शासन काळात जनता त्याने सांगितलेल्या नियमांचे पालन करते आणि त्याचे शासन संपल्यावर दुसऱ्या शासकाचे आदेश सर्वोपरि मानते, त्याचप्रमाणे जो पर्यंत ज्या (शास्ता, अवतार) पैगंबराचा काळ असतो तो पर्यंत त्याच्या उपदेशांचा प्रचार, प्रसार आणि विस्तार होत असतो. त्याच्या उपदेशात विकृती आली म्हणजे ईश्वर सन्मार्ग दाखविण्यास पुन्हा दुसरा पैगंबर पाठवितो. मग त्याचे शासन चालते. या दृष्टीकोनान्वये आज आम्ही (जग) प्रेषित मुहम्मद (स.) या अंतिम रसुल/पैगंबर अथवा शेवटचा अवतार कल्किच्या शासन काळात जगत आहोत. आता प्रलयापर्यंत त्यांचेच शासन राहणार याचे स्पष्ट प्रमाण आणि घोषणा पवित्र कुरआन व अन्य धर्मग्रंथांनी केली आहे. तात्पर्य आमच्या आध्यात्मिक आणि भौतिक जीवनाच्या प्रगति व यशस्वीते करीता आम्हाला अंतिम कल्कि अवतार महामान्य मुहम्मदांच्या उपदेशाचे व आचरणाचे अनुकरणा शिवाय दुसरा पर्याय नाही. हाच पर्याय अगदी योग्य व न्यायिक आहे जो आमचे सांसारिक जीवन तसेच पारलौकिक जीवन सुखद करून मोक्ष प्राप्तीचा मार्ग प्रशस्त करू शकतो.

''शेवटी हेच की, या अंतिम संदेष्टा, पैगंबर व कल्कि अवतार मुहम्मद (स.) यांच्या आदेशाचे व शिकवणीचे हृदयापासुन आचरण करणे हेच खऱ्या अर्थाने श्रध्दा सुमन अर्पण करणे होय. आणि हाच ईश्वराप्रति समर्पणाचा एकमेव मार्ग होय.''[१]

❊ समाप्त ❊

१) 'कांति' मासिक, दिल्ली, जुलाई १९९७ पृष्ठ ३३-३४

मराठी पब्लिकेशन्स ट्रस्ट, मुंबई ही एक इस्लाम समर्पित प्रकाशन संस्था आहे. ह्या एकनिष्ठ संस्थेचे ध्येय इस्लाम संदेश मराठी जगतात सर्वदूर पोहचविणे आहे. इस्लाम संबंधी अनेकानेक ग्रंथ मराठीत प्रकाशित करणे, इस्लाम विषयीचे मराठी जगतातील गैरसमज दूर करणे आणि इस्लामविषयी खरे ज्ञान मराठी भाषिकांपुढे ठेवणे जेणेकरुन एकेश्वरवाद त्याच्या शुद्ध स्वरुपात लोकांपुढे येईल यासाठी ट्रस्ट प्रयत्नशील आहे. समस्त मानव एक ईश्वराची निर्मिती आहे' हा इस्लामचा संदेश युगे युगे अनेकानेक प्रेषितांनी जगाला दिला आणि अंतत: हाच एकेश्वरवादाचा संदेश प्रेषित मुहम्मद (स.) यांनी मूळ स्वरुपात जगापुढे मांडला. ह्याच ध्येयपूर्तीसाठी इस्लामी मराठी पब्लिकेशन्स, ट्रस्ट, मुंबई ही प्रकाशन संस्था इस्लाम विषयी मराठी भाषेत इस्लामी साहित्य निर्मिती कार्य मोठ्या जोमाने पार पाडत आहे.

ISLAMIC MARATHI PUBLICATIONS TRUST
4, Hamid Building, 96, Hafiz Ali Bahadur Khan Marg,
Mominpura, Mumbai - 400 011.
Tel. : 2301 8387 / 2308 2820 ● Fax : 2305 2002
ISBN-81-87634-104